| लातूर | वर्ष ३४ वे | अंक २६८ वा | शनिवार, दिनांक १७ जानेवारी २०२६ | पृष्ठे ६ | किंमत १ रू.

RNI 47034/64

# लातूर समाचार

LATUR SAMACHAR
Email-dainiklatursamachar@gmail.com

(सांज दैनिक)
प्रकाशन: लातूर
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक) कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

## २६ जानेवारीपूर्वी बांगलादेशी दहशतवादी हल्ला करू शकतात

### दिल्लीसह अनेक राज्यांमध्ये अलर्ट जारी

**नवी दिल्ली : प्रजासत्ताक दिनाच्या समारंभाच्या आधी (२६ जानेवारी) सुरक्षा यंत्रणांनी एक मोठा इशारा जारी केला आहे. गुप्तचर सूत्रांच्या मते, खलिस्तानी दहशतवादी संघटना आणि बांगलादेशस्थित दहशतवादी गट दिल्लीसह देशभरातील प्रमुख शहरांना लक्ष्य करण्याचा प्रयत्न करू शकतात.**




गुप्तचर सूचनांनुसार, पंजाबमधील गुंड परदेशातून कार्यरत असलेल्या खलिस्तानी आणि कट्टरपंथी हँडलर्ससाठी पायदळ सैनिक म्हणून काम करत आहेत. असा आरोप आहे की हे हँडलर्स त्यांचा अजेंडा पुढे नेण्यासाठी आणि देशाच्या अंतर्गत सुरक्षेला कमकुवत करण्यासाठी गुन्हेगारी नेटवर्कचा वापर करत आहेत.

सुरक्षा एजन्सींनी जारी केलेल्या अलर्टमध्ये असे म्हटले आहे की हे गुंड हरियाणा, दिल्ली-एनसीआर, उत्तर प्रदेश आणि राजस्थानमध्ये सक्रिय आहेत आणि हळूहळू खलिस्तानी दहशतवादी घटकांशी संबंध प्रस्थापित करत आहेत.

२६ जानेवारी रोजी होणाऱ्या प्रजासत्ताक दिनाच्या परेडपूर्वी, उत्तर जिल्हा पोलिसांनी विविध भागधारक आणि एजन्सींची तयारी आणि प्रतिसाद वेळ तपासण्यासाठी संवेदनशील आणि गर्दीच्या ठिकाणी मॉक ड्रिलची मालिका आयोजित केली.

जानेवारी २०२६ च्या पहिल्या पंधरवड्यात उत्तर दिल्लीतील संवेदनशील ठिकाणी चार मॉक ड्रिल घेण्यात आल्या, ज्यात महत्त्वाच्या प्रतिष्ठाने, ऐतिहासिक स्थळे, प्रमुख बाजारपेठा आणि वाहतूक केंद्रांचा समावेश आहे, जिथे दररोज मोठ्या संख्येने लोक जमतात.

या भागात लाल किल्ला, आयएसबीटी काश्मिरी गेट, चांदणी चौक, खारी बाओली, सदर बाजार आणि मेट्रो स्टेशन समाविष्ट आहेत, जे सुरक्षेच्या दृष्टिकोनातून अत्यंत संवेदनशील मानले जातात. या सरावांचा उद्देश दहशतवादविरोधी उपाययोजना वाढवणे आणि संभाव्य दहशतवादी घटनांदरम्यान जनता आणि संस्थांना सतर्क राहण्यासाठी जागरूक करणे हा होता.

प्रजासत्ताक दिनाच्या संचलनात किमान ३० चित्ररथ प्रदर्शित केले जातील, जे भारताच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाचे आणि विकासात्मक कामगिरीचे चैतन्यशील पद्धतीने प्रदर्शन करतील. स्वातंत्र्याचा मंत्र - वंदे मातरम आणि समृद्धीचा मंत्र - आत्मनिर्भर भारत या थीम अंतर्गत हे चित्ररथ सादर केले जातील.

## बांगलादेशात आणखी एका हिंदू तरुणाची हत्या

**बांगलादेश/वृत्तसंस्था :** बांगलादेशातील अल्पसंख्याक हिंदू समुदायावर होणाऱ्या हल्ल्यांची मालिका थांबण्याचे नाव घेत नाहीये. राजबारी जिल्ह्यातील सदर उपजिल्हा येथे एका हिंदू तरुणाला जाणूनबुजून वाहनाने चिरडून ठार मारल्याची धक्कादायक घटना शुक्रवारी घडली. या घटनेमुळे स्थानिक हिंदू समुदायात भीतीचे वातावरण पसरले आहे.

मृत हिंदू तरुणाचे नाव रिपन साहा (वय, ३०) असे आहे. तो राजबारी येथील गोलंडा मोरे जवळील करीम फिलिंग स्टेशनवर कार्यरत होता. प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, एका वाहनचालकाने पंपावर इंधन भरले, मात्र पैसे देण्यास नकार दिला. रिपन साहाने त्याला थांबवण्याचा प्रयत्न केला असता, आरोपी चालकाने रागाच्या भरात जाणूनबुजून रिपनच्या अंगावर गाडी घातली. या भीषण अपघातात रिपनचा जागीच मृत्यू झाला.



या प्रकरणी पोलिसांनी तत्परता दाखवत वाहन जप्त केले असून, गाडीचा मालक अबुल हाशेम याला अटक केली आहे. हाशेम हा बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टीच्या राजबारी जिल्हा युनिटचा माजी कोषाध्यक्ष असल्याची माहिती समोर आली. यासोबतच चालक कमाल हुसेन यालाही बानिभान निपारा गावातून ताब्यात घेण्यात आले. हा अपघात नसून खुनाचा स्पष्ट प्रकार आहे. आरोपीने पैसे देण्यास नकार दिला तेव्हा पीडित तरुण वाहनासमोर उभा होता, तरीही चालकाने त्याला धडक दिली आणि पळ काढला, अशी माहिती सदर पोलीस ठाण्याचे अधिकारी खोंडकर झियाउर रहमान यांनी दिली.

बांगलादेशात गेल्या काही दिवसांपासून हिंदूंवरील अत्याचाराच्या घटनांमध्ये वाढ झाली. याच आठवड्यात दागनभुइयान उपजिल्ह्यात समीर दास या हिंदू तरुणाची धारदार शस्त्रांनी हत्या करण्यात आली. त्याचा मृतदेह एका शेतात आढळून आला होता. भारत सरकारने या घटनांबद्दल तीव्र चिंता व्यक्त केली आहे. अल्पसंख्याकांच्या सुरक्षेसाठी बांगलादेशच्या अंतरिम सरकारने कठोर पावले उचलावीत, अशी अपेक्षा भारताने व्यक्त केली आहे.मानवाधिकार संघटनांच्या मते, बांगलादेशातील सध्याच्या राजकीय अस्थिरतेच्या काळात अल्पसंख्याक हिंदू समुदाय असुरक्षित झाला असून, त्यांच्यावरील लक्ष्यित हल्ले हे मोठे आव्हान बनले आहे.

## शुभ इच्छा ..

प्रतिस्पर्धी जिंके जसा
दे खुलेपणाने शुभेच्छा
वैर सरावे स्पर्धे सोबत
महत्वाची असे स्वेच्छा

नाईलाजे हातमिळवणे
जरीमनी असेअनिच्छा
समोर होता गाठी भेटी
रे करावी लागते पृच्छा

विजयआपणांस मिळो
स्वाभाविक ती वांच्छा
ज्येता व्हावा समोरचा
क्वचित असे आकांक्षा

जाणून घ्यावे कसा तो
आपल्यापेक्षा रे अच्छा
व्हावेसामील उत्सवात
प्रतिस्पर्धी करतावृच्छा

मिरवणुकीत मी थिरके
का वरिष्ठा यावी मुर्च्छा
फितूर झाले का तिकडे
का तपासे आगा पिछा

कधी दिखाव्यासाठीही
रे द्यायची भेट सदिच्छा
मनात तळमळ असता
घडेल सहजते यदृच्छा

**हेमंत मुसरीफ पुणे.**
९७३०३०६९९६.

## प्रभाग ९ काँग्रेसचा अभेद्य किल्ला कायम


तबसुम मुख्तार शेख


योगेश उमाकांत स्वामी


सपना पांडूरंग किसवे


इसरार जब्बार सगरे

**लातूर/प्रतिनिधीः** लातूर महानगरपालिका निवडणुकीत काँग्रेसने मिळवलेले स्पष्ट बहुमत केवळ आकड्यांपुरते मर्यादित नसून, त्यामागे शहराच्या राजकारणावर पकड कायम असल्याचा ठोस संदेश आहे. ७० पैकी ४३ जागांवर मिळालेला विजय हा काँग्रेससाठी राजकीय पुनरागमनाचा टप्पा ठरला असून, त्याचे सर्वात ठळक उदाहरण म्हणजे प्रभाग क्रमांक ९ आहे. या प्रभागात काँग्रेसच्या चारही उमेदवारांनी निर्विवाद विजय मिळवत हा प्रभाग अजूनही पक्षाचा अभेद्य बालेकिल्ला असल्यावर शिक्कामोर्तब केले आहे.

महानगरपालिका स्थापनेपासून आजवर प्रभाग क्रमांक ९ मध्ये काँग्रेसची सत्ता अखंड राहिली आहे. सत्ता, संघटन आणि मतदारांशी असलेले भावनिक नाते या त्रिसूत्रीचे हे यश असल्याचे राजकीय विश्लेषक मानतात. यावेळी पक्षाने अनुभवी चेहऱ्यांऐवजी नव्या उमेदवारांवर विश्वास दाखवला, मात्र मतदारांनीही तोच विश्वास अधिक ठामपणे परत दिला. योगेश स्वामी, ईसरार सगरे, शेख तबसूम आणि सपना किसवे यांना मिळालेले मोठे मताधिक्य हे केवळ व्यक्तींचे नव्हे, तर काँग्रेसच्या स्थानिक नेतृत्वावर जनतेचा विश्वास कायम असल्याचे द्योतक आहे.

या निकालाने विरोधी पक्षांच्या रणनीतीवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. प्रभाग ९ मध्ये सत्ता परिवर्तनाचा प्रयत्न झाला असला तरी तो मतपेटीत अपयशी ठरला. त्यामुळे शहराच्या राजकारणात काँग्रेसचे स्थान अधिक भक्कम झाले आहे, आगामी काळात महापालिकेतील सत्ताकारणात प्रभाग ९ निर्णायक भूमिका बजावेल, हे स्पष्ट झाले आहे.

विजयानंतर काढलेल्या विजय रॅलीत कार्यकर्त्यांचा उत्साह आणि जनतेचा प्रतिसाद पाहता, काँग्रेसने हा विजय केवळ राजकीय यश न मानता विकासाच्या दिशेने संधी म्हणून पाहिल्याचे संकेत दिले. नवनिर्वाचित नगरसेवकांनी विकासकामांना गती देण्याचा निर्धार व्यक्त करत, विश्वासाला कामातून उत्तर देण्याचा सूर आळवला आहे. एकूणच, प्रभाग ९ मधील हा निकाल काँग्रेससाठी केवळ विजय नसून, लातूरच्या राजकारणातील वर्चस्वाची पुनःपुष्टी ठरली आहे.

## पराभवाने खचायचे नाही, काम करत राहायचे:अजित पवार यांचा कार्यकर्त्यांना सल्ला

**पुणे/प्रतिनिधीः** सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी महापालिका निवडणुकीत मिळालेल्या विजयाबद्दल भाजपचे कौतुक केले आहे. भाजपने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात ही निवडणूक लढली. त्यांना अतिशय चांगले यश मिळाले व इतरांचा पराभव झाला. पराभवाने खचायचे नसते. आपण आपले काम करत राहायचे असते, असे ते म्हणालेत.

महापालिका निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसची प्रचंड हाराकिरी झाली आहे. राज्यातील २९ महापालिकांत या पक्षाला केवळ १६७ जागांवर समाधान मानावे लागले. विशेषतः पुणे महापालिकेत दोन्ही राष्ट्रवादीची युती असूनही त्यांना केवळ ३० जागांवर समाधान मानावे लागले. पिंपरी चिंचवडमध्येही त्यांना केवळ ३७ जागा मिळाल्या. या पार्श्वभूमीवर अजित पवारांनी आज पत्रकारांशी संवाद साधला. त्यात त्यांनी भाजपचे कौतुक करत राष्ट्रवादी काँग्रेस भविष्यात अधिक जोमाने काम करेल असे स्पष्ट केले.

## उदगीर पालिकेच्या उपनगराध्यक्षपदी शीतल शिंदे:स्वीकृत नगरसेवकपदी कांबळे, गुरूडे, डॉ. बिरादार, हुडे यांच्या बिनविरोध निवडी

**उदगीर/प्रतिनिधीः** उदगीर नगरपरिषदेची पहिली सर्वसाधारण सभा शुक्रवारी नगर परिषदेच्या सभागृहात झाली. या सभेत उपनगराध्यक्षपदी शितल नरसिंग शिंदे यांची तसेच स्विकृत सदस्य म्हणून शिवकुमार कांबळे, अनिरुध्द गुरुडे, डॉ.बालाजी बिरादार हे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे तर भारतीय जनता पार्टीकडुन सचिन हुडे यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

उदगीर नगरपालिका निवडणुकीत नगराध्यक्षपदी सौ. स्वाती हुडे या निवडून आल्या असून या निवडणुकीत भाजपा-राष्ट्रवादी काँग्रेस युतीला स्पष्ट बहुमत मिळाले होते. सभागृहात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे २३, भारतीय जनता पक्षाचे १४, काँग्रेसचे ५ तर एमआयएमचे २ सदस्य असणार आहेत. सभागृहात राष्ट्रवादी काँग्रेसचे संख्याबळ अधिक असल्याने उपनगराध्यक्षपदासह तीन स्वीकृत सदस्य राष्ट्रवादीकडे, एक स्वीकृत सदस्य भाजपकडे गेले आहे. यावेळी माजी आ.गोविंदराव केंद्रे, माजी नगराध्यक्ष राजेश्वर निटुरे, नवनिर्वाचित नगराध्यक्षा सौ.स्वाती हुडे, सुधीर भोसले, बालाजी भोसले, मुख्याधिकारी सोमनाथ जाधव, शाम डावळे, अमोल अनकल्ले, गटनेते अनिल मुदाळे, गटनेते मनोज पुदाले, गटनेते मंजुरखाँ पठाण आदीसह सर्व प्रभागातील नगरसेवक उपस्थित होते. यावेळी नुतन उपनगराध्यक्ष व स्विकृत नगरसेवकांचा आ.संजय बनसोडे यांनी सत्कार करुन शुभेच्छा दिल्या आहेत.



## रजोनिवृत्ती काळातील शारीरिक, मानसिक, हार्मोनल बदलावर मार्गदर्शन अन् उपचार

### ग्रामीण रूग्णालयांमध्ये 'मेनोपॉज क्लिनिक'च्या माध्यमातून जागृती

**लातूर/प्रतिनिधीः** मेनोपॉज म्हणजे महिलांच्या आयुष्यातील अत्यंत जिव्हाळ्याचा व संवेदनशील टप्पा. या काळात होणारे शारीरिक बदल, मानसिक ताण, हॉर्मोनल असंतुलन, हाडांचे आजार, झोपेचे विकार व नैराश्य याकडे आजवर दुर्लक्ष होत होते. हीच गरज ओळखून राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांनी महिलांसाठी विशेष 'मेनोपॉज क्लिनिक' सुरू करण्याचा दूरदृष्टीपूर्ण निर्णय घेतला. या पार्श्वभूमिवर सार्वजनिक आरोग्य विभाग, लातूरने विविध रूग्णालयांमध्ये १४ आणि १५ जानेवारी रोजी विविध आरोग्यदायी उपक्रम राबवत महिलांची तपासणी व मार्गदर्शन केले.

आरोग्य उपसंचालक डॉ. रेखा गायकवाड, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. प्रदिप ढेले, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. अशोक सारडा, डॉ. आनंद कलमे आदी वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली १४ जानेवारी रोजी जळकोट ग्रामीण रुग्णालयात महिलांचे रजोनिवृत्ती कालावधीत होणाऱ्या शारीरिक,मानसिक वं हार्मोनल बदलावार योग्य वेळी वैद्यकीय उपचार,तपासणी व उपचार यासंबंधी सखोल मार्गदर्शन करण्यात आले. याशिवाय नियमितपणे होणाऱ्या मोनोपॉजल बाह्यरूग्ण विभागाबद्दल जनजागृती करण्यात आली.

सदरील कार्यक्रमाची प्रस्तावना करत वरिष्ठ आधीपरिचारिका श्रीमती सिरसाट यांनी मोनोपॉजल बाह्यरूग्णात महिलांना काय सुविधा मिळणार याबद्दल मार्गदर्शन केले. यावेळी डॉ.गजानन मोरे यांनी रजोनिवृत्ती कालावधीत होणाऱ्या शारीरिक,मानसिक वं हार्मोनल बदलावर योग्य वेळी वैद्यकीय उपचार,तपासणी वं उपचार याबाबत सखोल मार्गदर्शन केले. शिवाय गुरूवार, दि. १५ जानेवारी रोजी रजोनिवृत्त महिलांची तपासणी करून त्यांना योग्य उपचार व मानसिक आरोग्याबाबतीत समुपदेशन करण्यात आले. त्याचबरोबर रेणापूर ग्रामीण रूग्णालयातही रजोनिवृत्ती कालावधीत होणाऱ्या शारीरिक,मानसिक वं हार्मोनल बदलावर मार्गदर्शन अन् उपचार यासंदर्भात महिलांची तपासणी आणि मार्गदर्शन करण्यात आले.



उदगीर, निलंगासह १४ ठिकाणी उपक्रम सुरू सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत येणाऱ्या ११ ग्रामीण रूग्णालय, उदगीर सामान्य रूग्णालय, निलंगा उपजिल्हा रूग्णालय आणि लातूरचे स्त्री रूग्णालय १४ आरोग्य संस्थांमध्ये हे 'मेनोपॉज क्लिनिक' सुरू झाले आहे. हे क्लिनिक दर बुधवारी सुरू राहणार राहणार यामध्ये सर्व महिलांची तपासणी ही स्त्रीरोग तज्ज्ञांच्या माध्यमातून करण्यात येणार आहे. उपक्रमाच्या पहिल्याच बुधवारी सर्व संस्थांमध्ये ३६१ महिलांची तपासणी करण्यात आली.

देशात असा उपक्रम करणारे पहिले राज्य देशात प्रथमच अशा प्रकारचे मेनोपॉज क्लिनिक सुरू करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य ठरले आहे. महिलांच्या आरोग्याबाबत महाराष्ट्राने घेतलेले हे पाऊल इतर राज्यांसाठी मार्गदर्शक ठरणार आहे. मकरसंक्रांतीनिमित्त महिलांसाठी सुरू करण्यात आलेल्या या उपक्रमाला मोठा प्रतिसाद मिळत असून, खऱ्या अर्थाने महिलांच्या आरोग्याची गोड भेट दिल्याची भावना महिलांकडून व्यक्त होत आहे.

## कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



**लातूरने काँग्रेसची प्रतिष्ठा वाचवली...**

## चिमटा दयाचा



लातूर महापालिकेत आश्चर्यकारक निकालाची चर्चा जोरात चालू आहे ! राज्यात२९ पैकी २५ महानगरात कमळ फुलले आहे !!



ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## शेतकऱ्याचे जीवनमान सुधारणे आवश्यक

भारतीयांचा मुख्य व्यवसाय शेती आहे. कृषीप्रधान देशात शेती हा व्यवसाय वाढला पाहिजे. शेती हा व्यवसाय जोपासला पाहिजे. त्यासाठी कठोर उपायोजनाची गरज आहे. मुळात शेती हा व्यवसाय संकटात येत आहे. संकटात यासाठी की, तो आर्थिकदृष्टया परवडत नाही. मुळात भारतीय शेती ही निसर्गावर आवलंबुन आहे. निसर्ग साथ देत नाही. तो लहरी बनला आहे. त्याच प्रमाणे शेतकऱ्यास लागणारी औषधे, खतावर जीएसटी आकारली जात आहे. तो जीएसटी देवून शेती माल खरेदी करू शकेल मात्र परतावा बाबत शंकाच आहे. शेती मुळात कष्टकऱ्यांचा व्यवसाय आहे. त्याचे इतर व्यवसायसारखे इन्कमटॅक्स सारखे रिटर्न दरवर्षी भरलेले नसते. त्याने जीएसटी नंबर काढलेला नसतो. तो परतावा कसा मागेल हा एक संशोधनाचा विषय आहे. त्याप्रमाणे शेतीमालास एक तर माल खरेदीकरताना जीएसटीतून वगळले पाहिजे. नसता त्याला परतवा मिळण्याची सोय केली पाहिजे. तसे पाहिले तर शेतीमालास भाव ठरविण्याचा अधिकार शेतकऱ्यास नाही. तरी त्याला नावालाच मालक म्हटले जाते. ऊस साखर कारखान्यावर घालताना दर साखरकारखाने जाहिर करतात. सोयाबिन असो किंवा अन्य शेतीमालाचे दर हा दुसराच ठरवितो आहे. त्यामुळे नावालाच शेतीमालक म्हटले जाते. त्यामुळे विचार केला पाहिजे की, शेतकऱ्यास आर्थिक संकटातून कसे बाहेर काढता येईल. वरचेवर शेती हा व्यवसाय मोडकळीस येत आहे. हा धोका मोठा आहे. शेतकऱ्यांनी संप पुकारला व शेतीतून अन्नधान्य पिकविले नाही तर काय खाणार आहोत. कसे जीवन जगणार आहोत. शेतीमुळे मानवच नाही तर पशु-पक्षी जगले जातात. सकाळी शेतीत पक्षाचे थवेच्याथवे दिसून येतात. शेतीतील फळे असो किंवा ज्वारीचे पिक असो, कणसावर ताव मारणारे पक्षी पाहून शेतकरी त्यांना हाकलून देत नाही. जे पशुपक्षाने खाऊन उरले तो माल बाजारात विकून आपली उपजीविका भागवत असतो. असा दुसरा व्यक्ती दिसून येत नाही. व्यापारी असो किंवा सरकारी नोकरदार असोत अशी सेवा करताना दिसून येत नाहीत. शेतीचे नुकसान हारिणाचे कळपच्या कळात फस्त करतात. माकडे करतात. अन्य प्राणी करतात तरी तो तक्रार करीत नाही. अशात शेतकऱ्याचे आर्थिक संकटाला तोंड देता आपले जीवन संपवित आहेत. सर्वाधिक जीवन संपविणारा व्यक्ती हा शेतकरी हे सर्वांना माहिती आहे असे असून सुद्धा त्याला माल देताना जीएसटी लावून दिली जाते. तो परताव कसा मिळवेल हे आवघड बाब आहे. त्यामुळे शेतकरी हा संकटावर मात करीत आला आहे. एक तर त्याला निसर्ग साथ देत नाही. दुसरे बाजारात त्याच्याच उत्पादित मालास भाव ठरविण्याचा अधिकार नाही. तो व्यापारी बनू शकत नाही. ते मार्केटमध्ये दर आहेत त्यानुसार सोयाबिन विकत आहे. सोयाबिनला उत्पादिक मालास जेवढा खर्च येतो तेवढा कधी मिळत नाही. ही वस्तूस्थिती पाहावयास मिळते. कोणताही व्यापारी हा नुकसान करून धंदा करीत नाही मात्र शेतकरी नुकसान करून माल विकतो. घाट्यात धंदा करतो हे सर्वांना माहिती आहे. तरी कोणी सहकार्याची भुमिकेतून मदत करीत नाही. त्यामुळे जीवन संपविण्यात सर्वाधिक नोंद शेतकऱ्याची आहे ही बाब दुर्लक्षित करता येत नाही. शेतकरी हा पोशिंदा समजला जातो. आपण उपाशी राहुन इतरांना पोसणारा हा एकमेव शेतकरी आहे. अशा व्यक्तीकडे दुर्लक्ष होते हे योग्य नाही. इतरांनी लक्ष देण्यापेक्षा सरकारने लक्ष दिले पाहिजे. शेतीस लागणाऱ्या जवढ्या बाबी आहेत. तसे औषधे, खत आदि डीएसटीमुक्त मिळाले पाहिजे. मुळात अशांना जीएसटी लावणे योग्य नाही. इतराकडून जीएसटी वसुली केली जातेच. त्यामुळे शेतकऱ्याबाबत विचार केला पाहिजे. नसता एकदा शेतकरी कोलमोडला तर पुन्हा उभारी घेणे अशक्य होवू शकतो. विचारपुर्वक चालले पाहिजे. आज एकटा पंजाब असो किंवा मध्यप्रदेशातून गव्हाचे उत्पादन मोठ्या प्रमाणात होते. देशाला गव्हू पुरविण्याची क्षमता या दोन प्रांतात आहे. त्याच प्रमाणे ऊसाचे उत्पादन महाराष्ट्रात अधिक प्रमाणात होते. साखर उत्पादनात महाराष्ट्र पुढे आहेत. फळे व फुले हे प. महाराष्ट्रात उत्पादीत माल परदेशात पाठविला जातो. त्यामुळे देशाचे आर्थिक समिकरण हे शेतीवर आहेत हे लक्षात येते. शेती हा व्यवसाय निसर्गाच्या लहरीपनामुळे आर्थिक संकटात आडकला. एकीकडे निसर्ग साथ देत नाही तर दुसरीकडे सरकारचे लक्ष नाही. योग्य शेतीमालास भाव मिळत नाही. अशा विविध संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना अधिक संकटात टाकण्यापेक्षा मदतीची गरज आहे. सरकार इतरांना जसे उद्योगपती, कारखानदारांना मदत करते. तशी मदत शेतकऱ्यांना करणे आवश्यक आहे. शेती हा बहुतांशी शेतकऱ्याचा व्यवसाय आहे, तो जगविला पाहिजे. यासाठी सरकारने आखडता हात घेवू नये. विविध राज्यातून विविध पिक घेतली जातात. जसे पंजाब, हरियणा, मध्यप्रदेश, महाराष्ट्र जवढे प्रांत आहेत त्या प्रांतातील शेतकरी भिन्न उत्पादन घेत असतात. त्यातून मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होत असते. शेती ही आर्थिक संकटात सापडत असल्याने हा पारंपारीक व्यवसाय लोप पावतो की अशी भीती वाटायाला लागली आहे. शेतीत नंतरची पिढी येण्यात तयार नाही. शेती हा व्यवसाय कष्ठाचा आहे. अशा कष्ठाच्या व्यवसायात शिकलेली मंडळी किंवा इतर मंडळी पुढे येण्यात तयार नाही. याचा परिणाम शेती हा व्यवसाय लोप पावतो की काय असे वाटायाला लागले आहे. सरकारने वेळीच या बाबत विचारकरून पावले उचलण्याची गरज आहे. शेतकरी अजूनही रस्त्यावर उतरला नाही. निमुटपने संकटाशी मुकाबला करीत आहे. याचा परिणाम चांगला होणार आहे असे नाही. त्यामुळे शेतीसाठी लागणारी औषधे स्वस्तात मिळाली पाहिजेत. शेती मालास भाव ठरविण्याचा काही प्रमाणात का असत नाही शेतकऱ्यास अधिकार मिळाला पाहिजे. जेवढा खर्च येतो त्यावर किती दर ठरवावा या बाबत गणित ठरवुन योग्य शेतीमालाचे दर ठरविल्याशिवाय शेतकरी हा आर्थिकदृष्टया संपन्न होणार नाही. कृषी प्रधान देशात शेतकरी हा सुखी व संपन्न असला पाहिजे हा दृष्टिकोन डोळ्यासमोर सतत ठेवला पाहिजे.

# 'हिंद दी चादर' गुरु तेगबहादुर साहिब यांच्या गौरवशाली इतिहासाचे स्मरण




'हिंद दी चादर',श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या शहिदीला ३५० वर्षे पूर्ण होत असल्याने महाराष्ट्र शासन आणि श्री गुरु तेग बहादुर साहिबजी ३५० वी शहिदी समागम राज्यस्तरीय समितीमार्फत गेल्यावर्षी ७ डिसेंबर रोजी झालेल्या देखण्या आयोजनानंतर २४ आणि २५ जानेवारी २०२६ रोजी मान्यवरांच्या उपस्थितीत नांदेड येथे भव्य अध्यात्मिक कार्यक्रमाचे आयोजन होत आहे. श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांनी स्वाभीमान आणि देश रक्षणासाठी दिलेले बलिदान अनन्य साधारण आहे. त्यांच्या परिवारातील सदस्यांनीही देशासाठी शहादत दिली. हा गौरवशाली इतिहास सर्वांसाठी प्रेरणादायी आहे. त्याचे स्मरण करणारा आणि गुरुंनी देशासाठी दिलेल्या बलिदानावर प्रकाश टाकणारा हा लेख

कश्मीरचा सुभेदार हा शिखांचे नववे गुरु तेगबहादुर साहिब यांच्या मदतीसाठी गेले. 'ना पेह देना ! ना पेह सेना' म्हणत (घाबरायचे नाही व घाबरवयाचेही नाही) कश्मीरींच्या रक्षणासाठी गुरु तेगबहादुर साहिब यांनी थेट तत्कालीन सत्तेला आवाहन दिले व दिल्लीकडे कुच केली. आग्रा येथेच तेगबहादुरांना अटक करण्यात आली.दिल्लीला आणून त्यांना धर्मांतराची बळजबरी करण्यात आली. गुरु तेगबहादुरांनी त्यास नकार देऊन लाल किल्ल्यासमोरील चांदणीचौकात बलिदान दिले. त्यांचे हे बलिदान इतिहासात अमर झाले व भारतभूमीचे कवच म्हणून त्यांना 'हिंद दी चादर'म्हणून ओळखले जाते. सत्य व अहिंसेचे प्रेषित असलेल्या तेगबहादुरांनी बलिदान देऊन मानवी स्वातंत्र्याचा व स्वतःस पटेल तो धर्म आचरण्याचा आदर्श भारतीयांना घालून दिला.

श्री गुरु तेग बहादुर साहिब यांच्या सोबत अनेक समाज उभे होते विशेषत: सिकलीगर, बंजारा, लबाना, मोह्याल, सिंधी समाजांनी या संघर्षात मोलाचे योगदान देत तेगबहादुर साहेबांनी दिलेल्या देश व मानवतेच्या रक्षणाची शिकवण सर्वदूर पोचवली. भाई मतीदास, भाई सतीदास आणि भाई दयाल गुरु तेग बहादुरांच्या आत्मसन्मानासाठी आणि गुरुनिष्ठेसाठी शहीद झाले. हे समाज सेवाभाव, साहस आणि श्रद्धेसाठी ओळखले जातात. दिल्लीच्या ऐतिहासिक लाल किल्ला परिसरातील चांदणी चौकात सीसगंज गुरुद्वारा सर्व भारतीयांसाठी प्रेरणास्त्रोत ठरला आहे. याच ठिकाणी गुरु तेगबहादुरांनी तत्कालीन सत्तेला आपल्या प्राणांच्या आहुतीतून भारतीयांच्या एकीचा व सद्भावनेचा संदेश दिला. २५ मे १६७५ रोजी सत्ताधाऱ्यांच्या आज्ञेनुसार गुरु तेगबहादुरांचे शिर अमानुषपणे धडापासून वेगळे करण्यात आले आणि 'जो कोणी तेगबहादुरांचे उत्तर कार्य पार पाडेल त्याला व त्याच्या कुटुंबीयांना कठोर शिक्षा करण्यात येईल,' असा फतवा काढला.

अशा दहशतीच्या वातावरणामध्ये ढवळून निघालेले भारतीय मन नव्या उमेदीने उभे राहण्यासाठी धडपडू लागले. सत्तेची अवाज्ञा करून भाई जेतासिंह यांनी त्यांचे 'शिर'आनंदसाहेब दरबार येथे शिखांचे दहावे गुरू आणि गुरू तेगबहादुरांचे पुत्र गुरू गोविंदसिंह यांच्या सुपूर्द केले. इकडे भाई लखीशाह बंजारा यांनी मुलगा नाथईय्याजी यांच्या मदतीने गुरू तेगबहादुरांचे 'धड' दिल्लीतीलच रकाबगंज गावात आणले व आपल्या राहत्या घरात ते ठेवून घरालाच अग्नी दिला. त्यानंतर त्याच ठिकाणी पवित्र अस्थी जमिनीत पुरल्या आज तिथेच 'रकाबगंज गुरुद्वारा'उभा आहे.

त्याग व शौर्याचे प्रतीक 'सीसगंज' आणि 'रकाबगंज' गुरुद्वारा

सरदार बघेलसिंह यांनी १७८३ मध्ये दिल्ली सर करून लाल किल्ल्यावर कब्जा मिळवला आणि गुरू तेगबहादुरांच्या शहीदस्थळी सीसगंज गुरूद्वारा बांधण्यात आला. पुढे १९३० रोजी याच गुरूद्वाऱ्याचे पुनर्निर्माण करण्यात आले. स्वधर्माची ज्योत भारतीयांमध्ये तेवत ठेवण्याकरिता व प्रसंगी बलिदान देण्याचा संदेश देणारा सीसगंज गुरूद्वारा भारतीयांचे मुख्य श्रद्धास्थान ठरले आहे. दिल्लीच्या ऐतिहासिक लाल किल्ला परिसात स्थित सीसगंज गुरुद्वारा हा दिगंबर जैन अतिशय क्षेत्र लालमंदिरापासून सुरु होणाऱ्या चांदणीचौकाकडील रस्त्यावर आहे, तर संसद भवनाच्या मागील भागात रकाबगंज गुरुद्वारा स्थित आहे.

शीख धर्मियांचे मार्गदर्शक दहा गुरु आहेत. यापैकी दोन गुरु हे तेग बहादुरांचे आप्त आहेत. गुरु तेगबहादुर हे शिखांचे नववे गुरू असून सहावे शीखगुरू हरगोविंद यांचे ते सर्वात धाकटे पुत्र व शिखांचे दहावे व शेवटचे गुरू गोविंदसिंह यांचे ते पिता होत. तेगबहादुरांचा जन्म अमृतसर येथे झाला. वयाच्या ८ व्या वर्षी कर्तारपूर येथील लालचंदजी खत्री यांची कन्या गुजरी यांच्याशी तेगबहादुरांचा विवाह झाला. त्यांचे मूळ नाव त्यागमल होते. लहानपणीच त्यांना वैराग्य प्राप्त झाले. गृहस्थ असूनही ते वडिलांच्या मृत्युनंतर बकाला येथे जाऊन विरक्त वृत्तीने राहू लागले.

शिखांचे आठवे गुरू हरकिशन यांच्या निधनानंतर १६६४ मध्ये तेगबहादुर यांना नववे गुरू म्हणून गादीवर बसविण्यात आले. त्यांनी स्वतःसाठी शिवालिक पर्वतराजीत एक नगर वसविले आणि तिथे आपली गादी स्थापून ते धर्मप्रचारासाठी यात्रा करू लागले. हे नगर आनंदपूर म्हणून पुढे शिखांचे प्रसिद्ध व पवित्र क्षेत्र बनले. पाटणा येथे त्यांचे पुत्र गोविंदसिंह यांचा जन्म झाला. पुढे शिखांचे दहावे व शेवटचे गुरू गोविंदसिंह म्हणून ते उदयास आले.

तेगबहादुर यांच्या कुटुंबातील सात सदस्यांचे बलिदान

देशहितासाठी प्राणांचे बलिदान देणारे गुरु तेग बहादुर यांनी मोठा आदर्श घालून दिला. त्यांचीच शिकवण पुढे घेऊन जात त्यांच्या कुटुंबीयांनीही बलिदान दिले. आनंदपूरच्या लढायांनंतर सरदार वजीर खानाने गुरू गोविंदसिंग यांच्यावर हल्ला केला.यात मोठे दोन साहिबजादे अजीतसिंग आणि जुझारसिंग यांनी सरदाराच्या सैन्यासमोर शौर्याने लढत वीरगती प्राप्त केली. छोटे साहिबजादे जोरावरसिंग आणि फतेहसिंग यांना त्यांच्या आजी माता गुजरीजींसोबत सरहिंदच्या थडग्यात कैद करण्यात आले. वजीर खानाने त्यांना थंडीच्या रात्री उघड्यावर ठेवले आणि नंतर जिवंतपणे भिंतीत बंद करून मारले. या बलिदानाचे स्मरण करण्यासाठी केंद्र शासनाने २१ ते २७ डिसेंबर हा बलिदान सप्ताह आणि २६ डिसेंबर हा वीर बाल दिवस म्हणून घोषित केला व देशभर तो साजरा केला जात आहे. शिखांचे दहावे व शेवटचे गुरु, गुरु गोविंद सिंग यांनी १४ युद्धे लढली. १७०८ मध्ये नांदेड येथे देश रक्षणासाठी लढताना ते शहीद झाले. गुरु तेगबहादुरांनी आसामपासून काश्मीरपर्यंत आपल्या सद्विचारांचा प्रसार केला. त्यांनी विविध विषयांवर ११६ पद्ये रचली. ही पद्ये पुढे गुरू गोविंदसिगांनी गुरु ग्रंथसाहिबात अंतर्भूत केली. यांतील ५९ पद्ये 'शबद' (स्तोत्रे) आणि ५७ पद्ये 'श्लोक' आहेत. त्यांच्या रचनेत वैराग्य व क्षमाशील वृत्तीचा उत्कृष्ट आविष्कार आढळतो. अहिंसा व सत्याचे प्रेषित असलेल्या तेगबहादुरांनी प्राण त्याग करून मानवी स्वातंत्र्याचा व स्वतःस पटेल तो धर्म आचरण्याचा आदर्श भारतीयांना घालून दिला. त्यांच्या बलिदानाने भारतीयांमध्ये जी अस्मिता निर्माण झाली तिला इतिहासात तोड नाही. तेगबहादुर साहिब यांच्या शहिदीला ३५० वर्षे पूर्ण होत असल्याच्या निमित्ताने यावर्षी भारतभर मोठया प्रमाणात विविध कार्यक्रम आखण्यात आले आहेत.

'हिंद दी चादर'श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या ३५० व्या शहिदी समागमानिमित्त राज्यभर विविध प्रबोधनपर उपक्रम राबविण्यात येत आहेत. याअंतर्गत नागपूर येथील नारा परिसरातील सुरेश चंद्र सुरी मैदानावर ७ डिसेंबर २०२५ रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्यावर भारतीय डाक विभागामार्फत विशेष टपाल तिकीट जारी करण्यात आले. सिंधी आणि पंजाबी समाजाच्या इतिहासाचे दर्शन घडविणाऱ्या ऐतिहासिक शस्त्रांचे प्रदर्शन लावण्यात आले. विदर्भ आणि छत्तीसगढ मधील शीख, सिकलीगर, बंजारा, लबाना, मोह्याल, वाल्मीकी आणि सिंधी समाजबांधवानी एकत्र येऊन हा ऐतिहासिक समागम कार्यक्रम साजरा केला.

श्री हुजूर साहिब नांदेड

शीखांचे दहावे गुरू श्री गोविंद साहिबजी यांची कर्मभूमी ही महाराष्ट्रातील श्री हुजूर साहिब नांदेड असून याठिकाणी त्यांनी सर्व शीख बांधवांना उद्देशून, सब सिक्खन को हुकम हे गुरू मान्यो ग्रंथ साहिब असा उपदेश दिला होता. हा मानवतेचा संदेश घरोघरी पोचविण्यासाठी व श्री गुरु तेग बहादुर साहिब यांच्या त्यागाची शिकवण समाजाच्या सर्व घटकांत पोचविण्याच्या उद्देशाने नांदेड येथे येत्या २४ व २५ जानेवारीला शहिदी समागम कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे.

नांदेडमध्ये देहरुपी गुरु जाऊन गुरुग्रंथ साहिबची स्थापना झाली. नांदेड येथील बंदासिंग यांनी गुरु गोविंद सिंग यांच्या प्रेरणेने पंजाबात जाऊन परकियांशी लढा दिला व प्रशासक बनले. त्यांनी सरहिंद जिंकून शेतकऱ्यांना जमीन मालकीचा अधिकार दिला आणि स्वराज्याची पायाभरणी केली.

गुरू गोविंद सिंग यांनी १७०६ मध्ये 'जफरनामा' हे पत्र लिहून सत्ता प्रमुखाला नैतिकतेचे आव्हान दिले. हे पत्र फारसी भाषेत असून, त्यात सत्ताधिशांच्या विश्वासघातकी वर्तनाचा, जुलूमांचा आणि शीखांवर केलेल्या अत्याचारांचा समाचार घेतला. पत्र वाचून बादशाहने गुरूजींना सन्मानाने आणण्याचा आदेश दिला, पण गुरूजींनी ते नाकारले. हे पत्र शीख इतिहासातील विजयाचे प्रतीक मानले जाते.

मराठवाडयातील नरसी नामदेव हे थोर वारकरी संत, संत नामदेवांचे जन्म गावही याच भागात आहे. संत नामदेवांनी वारकरी संप्रदायाच्या विस्ताराकरिता देशभ्रमण केले. पंजाबात गेले असता त्यांच्या उद्बोधनाने सर्व समाज भारावला त्यांच्या ६१ अभंगांचा शिखांच्या पवित्र गुरु ग्रंथसाहिबमध्ये अंतर्भाव करण्यात आला आहे.

श्री गुरु तेग बहादुर साहिब यांचा देशरक्षण, सहिष्णुता आणि मानवतेचा संदेश महाराष्ट्रातील घराघरांत पोहचविण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासन तसेच शीख, सिकलीगर, बंजारा, लबाना, मोह्याल, वाल्मिकी उदासीन आणि गुरुनानक नामदेव संगत, तखत नांदेड गुरुसाहेब यांचा समावेश असलेल्या श्री गुरु तेग बहादुर साहिबजी ३५० वी शहिदी समागम राज्यस्तरीय समितीमार्फत नांदेड येथे २४ व २५ जानेवारी २०२६ रोजी शहिदी समागम कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. पंजाब, आंध्रप्रदेश, कर्नाटक, तेलंगना आणि मराठवाडयातील शीख व अन्य समाज बांधव मोठया संख्येने यात सहभागी होणार आहेत. गुरु तेगबहादुरांच्या कार्याची महिति पोचविण्यासाठी प्रत्येक शाळा,महाविद्यालये, विद्यापीठांमध्ये वक्तृत्व स्पर्धा, गीते, डाक्युमेंटरी प्रदर्शीत करण्यात येत आहेत. या सर्व आयोजनातून 'हिंद दी चादर'श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांचे महान विचार आणि अजोड कर्तृत्वाचा परिचय जनतेला होणार आहे.

**रितेश मो.भुयार,**
**माहिती अधिकारी,**
**माहिती व जनसंपर्क, नागपूर.**

## केसांची काळजी घ्यायचीय असा तयार करा 'हा' नैसर्गिक शॅम्पू, केस होतील दाट अन् काळेभोर!

महिला आपल्या केसांची खूप काळजी घेतात. केसांचे सौंदर्य महिलांच्या सौंदर्यात भर घालतं. केस सुंदर असतील, तर सौंदर्य आपोआप १० पटीने वाढते, पण केसांच्या काळजीसाठी बाजारात उपलब्ध असलेली सौंदर्य प्रसाधने कधी कधी त्यांना हानी पोहोचवतात. अशा परिस्थितीत, आज आम्ही तुम्हाला काही अशा टिप्स सांगणार आहोत, ज्या तुम्ही घरीच तयार करू शकता आणि त्या केसांना हानी न पोहोचवता पोषण देतात. आयुष डॉक्टर डॉ. रास बिहारी तिवारी सांगतात की, कडुलिंब त्याच्या अँटीबॅक्टेरियल आणि अँटीफंगल गुणधर्मासाठी ओळखला जातो. कोंडा, केस गळणे आणि टाळूचा संसर्ग यांसारख्या अनेक केसांच्या समस्या दूर करण्यासाठी ते खूप फायदेशीर ठरतं.

हा उपाय केल्याने तुमचे केस राहतील निरोगी

आयुष डॉक्टरांनी सांगितलं की, तुम्ही बाजारात उपलब्ध असलेल्या रासायनिक शॅम्पूऐवजी कडुलिंबापासून बनवलेला नैसर्गिक शॅम्पू वापरला, तर तुमचे केस मजबूत आणि दाट होऊ शकतात. ते म्हणाले की, १५-२० कडुलिंबाची पानं पाण्यात उकळा. आता त्यात ५-६ रिठे टाका आणि कमी आचेवर १० मिनिटे शिजू द्या. ते थंड झाल्यावर मिक्सरमध्ये वाटून गाळून बाटलीत भरा. हा शॅम्पू आठवड्यातून दोनदा वापरल्याने केस गळणे कमी होईल आणि टाळू निरोगी राहील.

निर्जीव केस होतील दाट आणि काळे

आयुष डॉक्टरांनी सांगितलं की, तुमचे केस कोरडे आणि निर्जीव झाले असतील, तर कडुलिंब आणि कोरफडीचा शॅम्पू तुमच्यासाठी सर्वोत्तम असेल. तो बनवण्यासाठी १०-१५ कडुलिंबाची पानं पाण्यात उकळून थंड होऊ द्या. आता त्यात २ चमचे कोरफडीचे जेल आणि अर्धा चमचा शिकेकाई पावडर टाका. हे मिश्रण चांगलं मिसळून केसांवर लावा. हा शॅम्पू केसांना पोषण देईल आणि ते मऊ आणि रेशमी बनवेल.

## साप चावल्यास चुकूनही करू नका या गोष्टी, अन्यथा जीव येतो धोक्यात, डॉक्टरांनी सांगितले ७ सोपे उपाय!

हिवाळ्यात झोपलेले साप उन्हाळा सुरू होताच बिळातून बाहेर येऊ लागले आहेत. विविध ठिकाणी साप दिसण्याच्या घटना वाढल्या आहेत. अशा परिस्थितीत, साप चावण्याच्या घटनाही वाढतील. साप चावल्यावर अनेक लोक जादूटोण्यात गुंततात. तर, काही लोक रुग्णालयात न जाता पारंपरिक पद्धतीने उपचार सुरू करतात.

काहीजण साप चावलेल्या ठिकाणी कापतात, तर काहीजण साप चावलेल्या जागेभोवती घट्ट बांधतात. पण, या सर्व पद्धती आता जुन्या झाल्या आहेत. नव्या युगात अपडेट व्हा. साप चावल्यास जखम कापू नका, विष तोंडाने ओढू नका किंवा जखमेभोवती घट्ट बांधू नका. त्याऐवजी आधुनिक पद्धतीने उपचार करा, जेणेकरून रुग्ण सहजपणे रुग्णालयात पोहोचू शकेल.

जमशेदपूर एमजीएम मेडिकल कॉलेज आणि हॉस्पिटलचे उपअधीक्षक डॉ. नकुल प्रसाद चौधरी यांनी काही खास टिप्स दिल्या आहेत. ते म्हणाले की, साप चावल्यास घाबरण्याची गरज नाही, परंतु संयम आणि योग्य उपायांनी परिस्थिती हाताळता येते. प्रत्येक साप विषारी नसतो आणि साप चावल्याने लगेच मृत्यू होत नाही.

**साप चावल्यावर पहिली गोष्ट काय करावी**

घाबरू नका, शांत राहा : साप चावल्यानंतर, रुग्णाने घाबरण्याची गरज नाही. जास्त घाबरल्याने किंवा पळाल्याने विष शरीरात वेगाने पसरू शकते.

जखम पाणी आणि साबणाने धुवा : साप चावलेली जागा वाहत्या पाण्याने चांगली धुवा. साबण उपलब्ध असल्यास, तोही लावा. यामुळे विषाचे प्रमाण काही प्रमाणात कमी होऊ शकते.

जखमेभोवती असले प्रकार करू नका : साप चावलेल्या ठिकाणी जखम करणे, तोंडातून विष काढणे किंवा जखमेभोवती घट्ट बांधणे यांसारखे कोणतेही घरगुती उपाय करू नका. यामुळे परिस्थिती बिघडू शकते.

शरीराची जास्त हालचाल करू नका : साप चावलेल्या भागाची जास्त हालचाल करणे टाळा. यामुळे विष शरीरात वेगाने पसरू शकते. बाधित भाग हृदयाच्या पातळीच्या खाली ठेवण्याचा प्रयत्न करा, जेणेकरून विषाचा प्रसार मंद होईल.

बाधित भाग हलक्या कापडाने झाका : साप चावलेल्या भागावर हलके कापड किंवा पट्टी सैलसर बांधता येते, परंतु ती जास्त घट्ट बांधू नये. यामुळे रक्तप्रवाहात अडथळा येऊ शकतो.

जवळच्या रुग्णालयात पोहोचा : साप चावल्यानंतर, वेळ न घालवता ताबडतोब जवळच्या आरोग्य केंद्रात किंवा रुग्णालयात जा. अगदी गावांमध्ये किंवा दुर्गम भागातही प्राथमिक आरोग्य केंद्रात अँटी-व्हेनम इंजेक्शन उपलब्ध असते, जे विष निष्प्रभ करू शकते.

मांत्रिकांच्या किंवा जादूटोण्यात गुंतू नका : साप चावल्यास, अनेक लोक जादूटोणा किंवा तंत्र-मंत्राचा अवलंब करतात, ज्यामुळे रुग्णाची स्थिती बिघडू शकते. डॉक्टरांच्या मते, हे पूर्णपणे चुकीचे आणि धोकादायक आहे.

**साप चावल्यास काय करू नये**

चाकू किंवा ब्लेडने जखम कापू नका.

तोंडाने विष काढण्याचा प्रयत्न करू नका.

जखमेवर कोणतेही रसायन, पावडर किंवा घरगुती उपाय लावू नका.

स्वत:हून कोणतेही औषध घेऊ नका, डॉक्टरांच्या सल्ल्यानेच उपचार करा.

**रुग्णाला जास्त धावू देऊ नका.**

साप चावल्यानंतर लवकर उपचार का करावे

सापांच्या अनेक प्रजाती विषारी असतात, ज्यांचे विष नसा, रक्त आणि स्नायूंना नुकसान पोहोचवू शकते. वेळेवर उपचार न केल्यास, विष शरीरात पसरून गंभीर समस्या निर्माण करू शकते. त्यामुळे, साप चावल्यावर ताबडतोब रुग्णालयात जाऊन अँटी-व्हेनम इंजेक्शन घेणे हाच उपाय आहे.

**जागरूक असणे महत्त्वाचेष्ठ**

डॉ. नकुल प्रसाद चौधरी यांच्या मते, योग्य वेळी योग्य उपचार मिळाल्यास, साप चावल्याने जीव वाचवता येतो. त्यामुळे जागरूक राहा, योग्य माहिती ठेवा आणि कोणत्याही अफवा किंवा अंधश्रद्धेला बळी पडू नका. मीडिया रिपोर्ट्सनुसार, एमजीएममध्ये साप चावण्याची चाचणी सुविधा सुरू होणार आहे. यामुळे, साप चावल्यानंतर किती विष पसरले आहे आणि त्यावर कसा उपचार करायचा, हे सहजपणे शोधता येईल.

मुलांना लागलेल्या मोबाईलच्या सवयीनं परेशान आहात फक्त लावा 'ही' सवय ज्या वयात मुलांनी खेळलं पाहिजे, गाणी म्हटली पाहिजे सोबतच अभ्यास केला पाहिजे अशा वयात ती मोबाईलच्या आहारी गेली आहेत. मुलं तासंतास सेल फोन, टॅब्लेट आणि संगणकांना चिकटलेली असतात. शाळेतून घरी येताचं ते स्क्रीनसमोर बसतात. सुट्टीच्या दिवशी तर त्यांचा अर्ध्यापेक्षा जास्त वेळ स्क्रीनसमोर जातो. यामुळे मुलांना मानसिक आणि शारीरिक समस्यांना तोंड द्यावं लागत आहे. त्यांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत आहेत. त्यांना डिजिडल स्क्रीनपासून दूर कसं ठेवावं हा अनेक पालकांच्या चिंतेचा विषय आहे. परंतु तज्ञांच्या मते मुलांना स्क्रिनपासून दूर ठेवण्यासाठी सायकलिंग हा एक पर्यायी मार्ग आहे. जर मुलांनी दररोज एक तास सायकल चालवली तर त्यांचं मानसिक तसंच शारीरिक आरोग्य तंदुरुस्त राहू शकेल.

एरोबिक व्यायाम: सायकलिंग हा एक एरोबिक व्यायाम आहे. जो शरीराच्या सर्व अवयवांना ऑक्सिजन प्रदान करतो. सायकल चालवल्याने पाय आणि मांड्यांचे स्नायू मजबूत होतात. हँडल्स संतुलित केल्याने हाताच्या स्नायूंचा व्यायाम होतो. सायकलिंगमुळे फुफ्फुसांची क्षमता दुप्पट होते. तसंच बाहेर सायकलिंग केल्यानं मुलांना व्हिटॅमिन डी मिळते.

मेंदूच्या आरोग्यासाठी चांगले: सायकल चालवताना मेंदू शरीराचे समन्वय साधतो. हे तुम्हाला हात, पाय आणि डोळ्यांचे समन्वय साधण्यास मदत करते. जे मेंदूच्या आरोग्यासाठी फायदेशीर आहे. सायकलिंगमुळे एंडोर्फिन बाहेर पडतात. त्यामुळे मुलं आनंदी राहतात तसचं त्यांचा उत्साह वाढतो. यामुळे एकटेपणा, ताणतणाव, चिंता आणि नैराश्य सारख्या समस्या नाहिशा होतात.

लठ्ठपणा रोखते: ''मुलांना सायकलिंगची सवय लावणे खूप फायदेशीर आहे. जंक फूडमुळे शरीरात तयार झालेली अनावश्यक चरबी जाळण्यापासून सायकलिंग रोखते. यामुळे मुलांमधील लठ्ठपणाची समस्या टाळता येवू शकते. तसंच दररोज सायकल चालवणारी मुले खूप सतर्क असतात. त्यांना इतर खेळांमध्ये भाग घेण्यास अधिक रस निर्माण होतो. तसंच ते आव्हानं स्वीकारण्यास नेहमी तयार राहतात. दररोज ४ ते ५ किलोमीटर सायकलिंग केल्याने रक्ताभिसरण सुधारते. हे हृदय आणि मेंदूच्या आरोग्यासाठी चांगलं आहे.

**निलोफर रुग्णालय बालरोगतज्ज्ञ, डॉ. उषाराणी,**

समाजात एकरूप होण्याची गरज: काही मुले शाळेत किंवा घरातपर्यंतच मर्यादित असतात. त्यांना इतरांना भेटायला आवडत नाही. अशा मुलांना सामाजिक संवादात सहभागी होण्यासाठी सायकलिंगला प्रेरित करणे आवश्यक आहे. इतर मुलांसोबत सायकलिंग केल्यानं नवीन मैत्री निर्माण होण्यास मदत होते. तज्ञांच्या मते, यामुळे ते हळूहळू त्यांच्या फोनपासून दूर जातात. सायकलिंग आणि पोहणे या आयुष्यभर न विसरणाऱ्या गोष्टी आहेत. सायकल चालवणे पर्यावरणासाठी देखील खूप फायदेशीर आहे. कारण सायकल चालवल्यानं कार्बन फूटप्रिंट कमी होतात. जे पर्यावरणाचं समतोल राखण्यास फायदेशीर आहे.

# हिवाळ्यात अति थंड हात असणे या आजाराचे लक्षण असू शकतात

हिवाळ्याच्या आगमनाने शरीराला विविध समस्या येऊ लागतात. थंडी वाढत असताना, दैनंदिन दिनचर्या, आराम आणि आरोग्यावर परिणाम होतो. सर्वात सामान्य समस्यांपैकी एक म्हणजे अत्यधिक थंड हात. लोक अनेकदा याला हवामानाचा परिणाम म्हणून दुर्लक्ष करतात, परंतु कधीकधी थंड हात हे अंतर्निहित आरोग्य समस्येचे लक्षण असू शकते.

-ङडज ठए-ऊ हिवाळ्यात हीटर चालवताना कधीही या चुका करू नका

हिवाळ्यात हात थंड का होतात?

शरीर थंडीपासून स्वतःचे संरक्षण करण्यासाठी एक नैसर्गिक यंत्रणा वापरते. जेव्हा तापमान कमी होते तेव्हा शरीर हृदय आणि मेंदूसारखे महत्त्वाचे अवयव उबदार ठेवण्यासाठी त्वचेजवळील लहान रक्तवाहिन्या आकुंचन पावते. याला रक्तवाहिन्या आकुंचन म्हणतात. कारण हात हृदयापासून सर्वात दूर असतात आणि त्यांचा पृष्ठभाग मोठा असतो, ते लवकर थंड होतात. परंतु जर हात जास्त थंड असतील तर त्यामागे इतर कारणे असू शकतात.

चरीरींहळ

महानगरपालिका

निवडणुक निकालानंतर

उपमुख्यमंत्री अजित पवार यांची पहिली प्रतिक्रिया समोर आली

अधिक जाणून घ्या

थंड हातांची संभाव्य कारणे

रेनॉड फिनोमेनन - या स्थितीत, थंडीमुळे किंवा ताणामुळे बोटांमधील रक्तवाहिन्या जास्त प्रमाणात अरुंद होतात. यामुळे बोटे थंड, सुन्न आणि वेदनादायक होऊ शकतात. कधीकधी, बोटे पांढरी, निळी आणि नंतर लाल होतात.

रक्ताभिसरण बिघडणे - पेरिफेरल आर्टरी डिसीज (झ-ऊ) सारख्या आजारांमध्ये, नसांमध्ये चरबी जमा झाल्यामुळे रक्त प्रवाह कमी होतो, ज्यामुळे हात थंड वाटतात.

हायपोथायरॉईडीझम - जर थायरॉईड योग्यरित्या कार्य करत नसेल तर शरीरातील चयापचय मंदावते. याचा रक्ताभिसरणावर परिणाम होतो आणि व्यक्तीला जास्त थंडी जाणवते.

अशक्तपणा - लोह किंवा व्हिटॅमिन बी १२ च्या कमतरतेमुळे रक्ताची ऑक्सिजन वाहून नेण्याची क्षमता कमी होते, ज्यामुळे हातपाय थंड होऊ शकतात.मधुमेह - रक्तातील साखरेचे प्रमाण जास्त असल्याने नसा आणि नसा खराब होऊ शकतात, ज्यामुळे हातांचे तापमान योग्यरित्या नियंत्रित करता येत नाही. ताण आणि चिंता - अति ताणतणावात, शरीर लढा किंवा पळून जाण्याच्या स्थितीत जाते, ज्यामुळे हातांपेक्षा स्नायूंमध्ये जास्त रक्त वाहते आणि हात थंड होतात. -ङडज ठए-ऊ थळपींशी वीळपझी: सर्दी आणि फ्लू टाळण्यासाठी या ३ पेयांपैकी एक प्या

थंड हातांपासून आराम मिळवण्याचे सोपे मार्ग उबदार कपडे घाला: चांगले हातमोजे किंवा हातमोजे घाला आणि तुमचे शरीर झाकून ठेवा. सक्रिय रहा: हलका व्यायाम, चालणे किंवा हाताच्या हालचालींमुळे रक्ताभिसरण सुधारते.

बाहेरून उष्णता मिळवा: कोमट पाणी, गरम चहा किंवा हात गरम करणारे यंत्र वापरा.

तुमच्या आहाराकडे लक्ष द्या: लोह आणि व्हिटॅमिन बी समृद्ध असलेले पदार्थ खा आणि भरपूर पाणी प्या. ताण कमी करा: योग, ध्यान आणि खोल श्वास घेण्याची सवय लावा.

-ङडज ठए-ऊ वारंवार सर्दी आणि खोकला होतोय? कारणे आणि प्रतिबंधात्मक उपाय जाणून घ्या डॉक्टरांना कधी भेटणे आवश्यक आहे?

जर तुमचे हात उष्ण हवामानातही थंड राहिले किंवा तुमच्या बोटांचा रंग बदलणे, जखमा बऱ्या होण्यास उशीर होणे, शरीराच्या एकाच भागात तीव्र वेदना किंवा सुन्नपणा येणे अशी लक्षणे आढळली तर ताबडतोब डॉक्टरांचा सल्ला घ्या.





## उपदेशकथा जादूगार नरेंद्र

स्वामी विवेकानंदांचे लहानपणीचे नाव होते नरेंद्र. तो शाळेत असतानाची ही गोष्ट. सिरापिस नावाची एक ब्रिटिश युद्धनौका खिदरपूरच्या घाटावर नांगरून पडली होती. नरेंद्र आणि त्याच्या मित्रांच्या मनात आले की, आपण ती आतून पहावी पण त्यांना आत सोडणार कोण? मग एके दिवशी त्यांना कळले की, जवळच्या बंगल्यात राहणारा एक ब्रिटिश अधिकारी नौका पाहण्यासाठीच्या प्रवेशिका देतो. लगेच हे सगळे मित्र तेथे जाऊन पोहोचले पण बंगल्याचा रक्षक त्यांना आत जाऊ देईना, सगळी मुले त्याच्याभोवती गोळा होऊन त्याच्याशी हुज्जत घालू लागली पण तो कोणास दाद लागू देईना. एवढ्यात त्या बंगल्याच्या दारातून नरेंद्र हसत हसत आणि हातात प्रवेशिका नाचवित बाहेर आला. सगळ्यांनी एकच जल्लोष केला. रक्षक तर आश्चर्यचकितच झाला. त्याने नरेंद्राला विचारले, ङ्काय रे, तू कसा काय आत घुसलास?फ त्यावर नरेंद्र त्याला म्हणाला, ङ्तुम्हाला ठाऊक नाही - मी एक जादूगार आहे. मी अदृश्य झालो. आत गेलो आणि साहेबापुढे पुन्हा प्रकट होऊन प्रवेशिका घेऊन आलो.फ तो रक्षक आ वासून बघत असताना सर्वजण युद्धनौकेकडे जाण्यास निघाले. वाटेत मित्रांनी खरे काय झाले ते विचारल्यावर नरेंद्र त्यांना म्हणाला, ङ्अरे कसली जादू अन् कसलं काय ! तुम्ही त्याच्याशी हुज्जत घालत होता तेव्हा माझ्या लक्षात आलं की, त्या बंगल्याला मागच्या बाजूलाही एक दार आहे म्हणून मग मी गुपचूप मागे जाऊन त्या दारानं साहेबांकडे गेलो आणि आणल्या प्रवेशिका !कथा **उपदेश :** वेळप्रसंगी युक्तीचा वापर केल्यास ती यशस्वी होते.



# आनंदी राहण्याचा निर्णय घ्या - सुधांशु महाराज



आनंदी राहाणे ही एक चांगली सवय आहे. पण, लोक आनंदी राहाण्यापेक्षा दुःखाची कारणे शोधण्यातच वेळ घालवतात. आनंदी राहण्यामुळे सकारात्मक ऊर्जा प्रवाहित होऊन सुख आणि समृद्धी येते. म्हणून आनंदी राहण्याचा निर्णय घ्या. प्रसन्नतेत सौंदर्य आहे. प्रसन्नता आनंदी राहण्यामुळे येते. त्यामुळे आनंदी राहा. वेळ, शक्ती, उर्जा व योग्यतेचा उपयोग केल्यास आपली प्रगती निश्चित आहे. प्रत्येकाने आधी स्वत:ला ओळखले पहिजे. जो स्वत:ला ओळखत नाही तो स्वत:चा शत्रू असतो, असे समजा. स्वत:ला ओळखणाऱ्याची प्रगती आणि विकास होतो. सुख, समृद्धी, यश त्याच्या दाराशी येते. या उलट आळशी, निष्काळजी, विकासापासून दूर पळणाऱ्या आणि आलेली संधी गमावणाऱ्याला कधीही सुख-शांती मिळत नाही. विद्या, शौर्य, कौशल्य, शक्ती व धैर्य हे पाच गुण तुमचे मित्र आहे. नकारात्मक विचार आणि उदासीन दृष्टिकोनामुळे हे पाचही मित्र हरवतात. आणि तुम्ही आठवण केली तेव्हा तुमच्या मदतीला धावून येतात. पण, ते हरवल्यानंतर त्यांना शोधण्यासाठी बाहेर धाव न घेता स्वत:च्या अंतरंगात शोधा. कारण हरवलेली वस्तू हरवलेल्याच ठिकाणी सापडते हे लक्षात घ्या. दिवसाची सुरुवात नामस्मरण आणि नमस्काराने करा. कारण नमस्कार भगवंतालाही आवडतो. नेहमी हसतमुख राहा. त्यामुळे तुम्ही स्वत: तर आनंदी राहताच पण, तुमच्या संपर्कात येणाऱ्यालाही आनंद देता.

**गुरु वचन**

# भारतापुढे इराणी पेच

जागतिक स्तरावर भारत एक महाशक्ती बनत असल्याचा दावा सरकार करत असले तरी प्रत्यक्षात आशियातही भारताची अडचण झाली आहे. इराणबाबत वाट बघा व निरीक्षण करा हेच धोरण बाळगावे लागेल.

इराणमधील स्थिती दिवसेंदिवस बिघडत चालली आहे. सत्ताधार्यांविरुद्ध आंदोलन करणार्या नागरिकांची अक्षरश: कत्तल सुरू आहे. सर्व भारतीयांना इराण त्वरित सोडण्याची सूचना केंद्र सरकारने केली आहे. सर्व आंतरराष्ट्रीय उड्डाणांसाठी आपली हवाई हद्द इराणने बंद केली. त्याचे स्पष्टीकरण तेथील सरकारने दिलेले नाही. नागरिकांचे आंदोलन दडपल्यास कठोर कारवाई करण्याचा इशारा अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दिला होता. त्यामुळे हवाई हद्द बंद करण्याचा निर्णय इराणने घेतला असावा. त्यामुळे अमेरिकेतून भारतात येणारी दोन व मुंबईहून अमेरिकेस जाणारे एक अशी तीन उड्डाणे एअर इंडियास रद्द करावी लागली. पाकिस्तानने आपली हवाई हद्द भारतीय विमानांसाठी आधीच बंद केल्याने युरोप आणि अमेरिकेत जाण्यासाठी दुसरा मार्ग भारतीय हवाई वाहतूक कंपन्यांना शोधावा लागणार आहे. त्यामुळे प्रवासाचा वेळ व खर्चही वाढेल, निर्यातही महागेल. रियाल या इराणी चलनाची किंमत अचानक कोसळली त्यामुळे नागरिक संतापले व धार्मिक सत्ताधीशांचा निषेध करण्यास रस्त्यावर उतरले. सुमारे दोन आठवडे इराणमध्ये आंदोलने सुरू आहेत. गेल्या आठवड्यात निदर्शने चिरडण्याची कारवाई इराणच्या सरकारने सुरू केली. त्याचा जगातून निषेध होत आहे.

**सावध धोरणाची गरज**

इराणमधील घडामोडींवर भारताने अजूनपर्यंत कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया दिलेली नाही; मात्र सरकारी वर्तुळात अस्वस्थता आहे. भारत व इराणची मैत्री जुनी असली तरी ती मुख्यत: प्रादेशिक राजकीय समतोलावर आधारित आहे. अफगाणिस्तान व मध्य पश्चिम आशियात जाणारा मार्ग पाकिस्तानने रोखला आहे. त्यामुळे भारतास तेथे पोचण्यासाठी इराण हाच एकमेव पश्चिमी मार्ग आहे.



पश्चिम आशियातील पाकिस्तानचे वर्चस्व वाढू नये याची काळजी इराण घेत आहे. इराणमध्ये शिया पंथीयांची सत्ता आहे, तर पाकिस्तानात सुन्नी पंथाचे प्राबल्य आहे. त्या सत्ता समतोलाचा भारतास अप्रत्यक्ष फायदा होत आहे. आंतरराष्ट्रीय व्यूहात्मक राजकीय हालचाली करण्यासाठी आशियात भारतास कमी वाव उरला आहे. याचे कारण बांगला देशात झालेला सत्ता बदल भारतास अनुकूल नाही, दहशतवादी कारवायांद्वारे पाकिस्तान आव्हान देत आहे, चीनचा प्रादेशिक विस्तारवाद ही देखील अडचणीची बाब आहे. अशा स्थितीत जर इराणचे सरकार कोसळले किंवा कमकुवत झाले, तर या प्रदेशात सामरिक राजकीय हालचाल करण्याच्या भारताच्या क्षमतेवर आणखी मर्यादा येतील. ट्रम्प यांच्या चमत्कारिक धोरणांमुळे त्यात भर पडली आहे. इराणमधील चाबहार बंदरामुळे पाकिस्तानला डावलून भारतास पश्चिमेत जाण्यास रस्ता व रेल्वे मार्ग उपलब्ध झाला आहे; पण तो कायम खुला राहाण्यासाठी भारत व इराण यांच्या सरकारांमध्ये समन्वय असणे आवश्यक आहे. चाबहार बंदरात भारत कोट्यवधी डॉलर्सची गुंतवणूक करत आहे. सत्ताबदल झाल्यास त्या कराराचे भवितव्य व भारताची गुंतणूक धोक्यात येईल. इराणबरोबरचा व्यापार घटल्यास भारताचा कोट्यवधी डॉलर्सचा तोटा होईल. इराणने भारताची पाकिस्तानच्या विरोधात ९० च्या दशकापासून पाठराखण केली आहे. काश्मीरच्या मुद्द्यावरून भारतावर निर्बंध आणण्याचा पाकिस्ताने तेव्हा प्रयत्न केला होता, तो इराणच्या हस्तक्षेपामुळे अपयशी ठरला होता. पाकिस्तानच्या मदतीने अफगाणिस्तानात व उत्तर पश्चिम आशियात प्रवेशण्याचा चीनचा हेतू आहे. जर इराणचे मध्यवर्ती सरकार कोसळले किंवा दुबळे झाले, तर या दोन देशांना बळ मिळेल, भारतासाठी ती डोकेदुखी ठरेल. पाश्चात्त्य देशांनी इराणवर निर्बंध लादल्याची संधी साधून चीनने इराणशी २०२१ मध्ये व्यापार करार केला. त्यामुळे इराणची चीनला होणारी निर्यात १४.५ अब्ज डॉलर्सवर पोचली. चीन इराणचा सर्वांत मोठा व्यापारी भागीदार होणे हा भारतासाठी धोक्याचा इशारा आहे. इराणमधील स्थिती कोणते वळण घेईल याचा अंदाज बांधणे कठीण आहे. कोणाचीही बाजू न घेता आपले हितसंबंध जपण्यास भारतास प्राधान्य द्यावे लागेल.

## १ Doctor Tips — सल्ला डॉक्टरचा



पेरू खाल्ल्यानं हिमोग्लोबीनचं प्रमाण वाढतं. दररोज किमान एक पेरू खाल्लाच पाहिजे. बिटामुळेही हिमोग्लोबीन वाढतं. जेवणात सॅलडचं प्रमाण जास्त ठेवावं. डाळिंब खाल्ल्यानंही हिमोग्लोबीनचं प्रमाण संतुलित राहतं. डाळींबाचा रसही फायद्याचा ठरतो. सफरचंद खाल्ल्यानं अशक्तपणा दूर होतो. तुळशीपत्र खाल्ल्यानं शरीरातील हिमोग्लोबीन संतुलित राहायला मदत होते. मध अनेक आजारांवर रामबाण उपाय आहे. ते एखाद्या औषधासारखं काम करतं. ॲनिमिया झालेल्या लोकांनी मधातील लोहासाठी त्याचं नियमित सेवन करावं.

## २ Joke — विनोद





निवडणुकीच्या काळात एका नेत्याने आपल्या पत्नीस विचारले, ङ्माझे सर्व हितचिंतक, मित्र माझ्यासाठी काहीतरी करणार आहेत. तू माझ्यासाठी काय करावयाचे ठरवले आहेस?फ पत्नीने जवळचा एक मोठा रुमाल पतीच्या हातात दिला आणि म्हणाली, ङ्हा रुमाल जवळच ठेवा. निवडणुकीनंतर अश्रू पुसायला त्याची मदत खूप होईल.

## ३ Message — संदेश



Ladka speedbraker ke upper se bike
nikalega ya side se....
ye espe depend karta hai
peeche Friend Betha Hai ya
Girlfriend...

## ४ Thought — सुविचार



कोणतेही कार्य ही ईश्वराची सगुण मूर्तीच आहे असे जाणून कामाला लागा. **- बहिणाबाई चौधरी**

**संस्कृत सुभाषित**

**कुग्रामवासः कुलहीनसेवा, कुभोजनं, क्रोधमुखी च भार्या।पुत्रश्च मुर्खो, विधवा च कन्या, विनाऽग्निना षट् प्रदहान्ति कायम्।।**

अर्थ - वाईट गावात राहणे, कुलशील नसलेल्यांची (चारित्र्यहीनाची) सेवा, वाईट भोजन, रागीट चेहऱ्याची पत्नी, मूर्ख पुत्र आणि विधवा कन्या या सहा गोष्टींमुळे माणूस आगीशिवाय जळतो.

# महाशब्दकोड्यांचा समाचार



### आडवे शब्द

१. उन्हाळ्यात दिलासा देणारा पाऊस
३. चामखीळ
४. पराजय
७. कौसल्यापुत्र
९. कर्ज देणारा
१०. नवरदेवाकडील मंडळी
१२. पंख
१३. कपडालत्ता
१६. तापविणारा सूर्य
१८. गुजराथी नृत्यप्रकार
१९. झोपडी
२०. भांडण
२१. बारा स्वारांच्या अक्षरांची मालिका उदा. क, का, की, कि, कु, कू, इत्यादी
२३. चप्पल
२४. लवकर, वेगाने
२६. ख्रिश्चन धर्माचे प्रमुख धर्मगुरु
२७. बारा वर्षाचा काळ
२९. कोर्टातील कथन
३०. गीत, नृत्य, वाद्य यांचा संगम
३२. नवरा (ग्रा.)
३५. रमणीय
३६. धुंदी
३८. ज्ञानेश्वरीत उल्लेखलेला एक पक्षी
४०. श्रीमंत
४१. एक क्षार
४२. रस काढण्याचे यंत्र
४४. चिंतन
४५. अंत:करण
४६. तेज
४८. मध्यभागी
५०. प्रत्येक दिवशी
५२. वांग्याचा खमंग पदार्थ
५३. गुरांचा समुदाय
५४. मऊ
५६. कौरव पांडवांची कथा
५८. पुरुष, शूर पुरुष
५९. समीक्षा
६२. मदनपत्नी
६३. कपटी
६८. एक पालेभाजी
६९. परमेश्वर
७०. चिंता
७२. मिठी
७३. एकदम पडलेला शेणाचा गोळा
७४. अजागळ
७६. आशीर्वाद
७९. एकत्रित रडणे
८०. सुगंध
८१. बारावी रास
८२. तानाजीला दिलेली पदवी, शूर पुरुष

### उभे शब्द

१. व्यर्थ बडबड, चऱ्हाट
२. लग्नासाठी जमलेले गणगोत
३. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन घेणारी संस्था (फक्त आद्याक्षरे)
३अ. फुरसत
४. पुन्हा पुन्हा
५. घर
६. आशीर्वाद
७. असुर
८. नामशेष
९. सर्प
११. दुसऱ्याकडे भोजन घेणे, व्रतकाळात हे पाप समजतात
१२. अनुमती
१४. वाढलेला व्याप
१५. वही
१७. सोंगट्यांचे वस्त्र
१९. झीज, नुकसान
२०. पोते
२१. दावा
२३. हेलपाटा
२५. पृथ्वी
२६. कुबड
२८. घागरा
३०. एकत्र गोळा करणे, जमविणे
३१. श्रीविष्णूचे नावडते फूल
३३. दशमुखी रावण
३४. चाक
३७. एक हिंस्त्र पक्षी
३८. झोंबणारे
३९. लिहिलेले वाचणारा
४०. सन्मानाची रक्कम
४३. पंकज
४४. माझे
४५. इच्छा
४७. अभिप्राय
४९. हत्यारांची, सामानाची पिशवी बहुदा न्हाव्याकडील
५०. इटलीची राजधानी
५१. लोखंड (हिंदी)
५२. ओहोटीच्या विरुद्ध
५३. पाषणहृदयी
५५. रसदार
५६. दुसऱ्याच्या मनातील भाव ओळखणारा
५७. हिंदुस्थान
५८. मौज
६०. फणसाचा एक प्रकार
६१. नागपूरचे प्रसिद्ध फळ
६३. गाजावाजा
६४. तोटी
६६. खिडकीची काच
६७. यावर्षी
६८. नोकर
७१. आयुष्य
७५. पुरे!
७७. मादीच्या विरुद्ध
७८. धातूचा जाड-बारीक धागा

### आडवे उत्तर

१.वळीव ३.मस ४.पराभव ७.राम ९.सावकार १०.वरपक्ष १२.पर १३.कापडचोपड १६.तपन १८.रासगरबा १९.खोपट २०.वाद २१.बाराखडी २३.खेटर २४.भरभर २६.पोप २७.तप २९.साक्ष ३०.संगीत ३२.दादला ३५.रम्य ३६.नशा ३८.चक्रवाक ४०.मालदार ४१.नवसागर ४२.चरक ४४.मनन ४५.मन ४६.चमक ४८.मधोमध ५०.रोज ५२.भरीत ५३.कळप ५४.नरम ५६.महाभारत ५८.मर्द ५९.टीका ६२.रती ६३.गजानन ६५.पाताळयंत्री ६८.चाकवत ६९.देव ७०.काळजी ७२.कव ७३.पो ७४.गबाळ ७६.वरदान ७९.रडारड ८०.सुवास ८१.मीन ८२.नरवीर

### उभे उत्तर

१.वटका २.वऱ्हाड ३.मसाप ३अ.सवड ४.परतपरत ५.भवन ६.वर ७.राक्षस ८.बरबाद ९.साप ११.परान्नभक्षण १२.परवानगी १४.पसारा १५.चोपडी १७.पट १९.खोट २१.बारदान २२.खटला २३.खेप २५.रसा २६.पोक २८.परकर ३०.संकलन ३१.तगर ३३.दशानन ३४.चक्र ३७.ससाणा ३८.चरचरीत ३९.धोपटी ५०.रोम ५१.लोहा ५२.भरती ५३.कर्दनकाळ ५५.रसाळ ५६.मनकवडा ५७.भारत ५८.मजा ६०.कांपा ६१.संत्री ६३.गवगवा ६४.नळ ६६.तावदान ६७.यंदा ६८.चाकर ७१.जीवन ७५.बास ७७.नर ७८.तार




# गोशाळेचा प्रवास पाहून मला खूप अभिमान वाटतो-सोनू सूद



बॉलिवूड अभिनेता सोनू सूद यांनी पशुकल्याणासाठी पुढाकार घेत गुजरातमधील एका गोशाळेला २२ लाख रुपयांची देणगी दिली आहे. बॉलिवूड अभिनेता सोनू सूद यांनी पशुकल्याणासाठी पुढाकार घेत गुजरातमधील एका गोशाळेला २२ लाख रुपयांची देणगी दिली आहे ही गोशाळा परित्यक्त, जखमी आणि वाचवलेल्या जनावरांची काळजी, संरक्षण आणि सन्मानाने देखभाल करते. इतक्या मोठ्या स्तरावर ही सेवा सुरू ठेवण्यासाठी सातत्याने संसाधने आणि पाठिंबा आवश्यक असल्याचे एका प्रसिद्धीपत्रकात सांगण्यात आले आहे.

ही गोशाळा परित्यक्त, जखमी आणि वाचवलेल्या जनावरांची काळजी, संरक्षण आणि सन्मानाने देखभाल करते. इतक्या मोठ्या स्तरावर ही सेवा सुरू ठेवण्यासाठी सातत्याने संसाधने आणि पाठिंबा आवश्यक असल्याचे एका प्रसिद्धीपत्रकात सांगण्यात आले आहे. गोशाळेचा प्रवास पाहून मला खूप अभिमान वाटतो. काही मोजक्या गायींपासून सुरू झालेला हा उपक्रम आज सात हजार गायींपर्यंत पोहोचला आहे. हे केवळ आमच्यासाठीच नाही, तर प्रत्येक गावातील प्रत्येक व्यक्तीसाठी अभिमानाची बाब आहे, असे सोनू सूद यांनी निवेदनात म्हटले.

मला मिळालेल्या प्रेमामुळे मी खूप आनंदी आणि अभिमानित झालो. मी इथे पुन्हा पुन्हा येत राहीन. इथे ज्या पद्धतीने गोसंरक्षण केले जाते, ते संपूर्ण भारतात राबवले गेले पाहिजे, असेही त्यांनी सांगितले. सोनू सूदच्या शब्दांतून गोशाळेतील मानवता, करुणा आणि जबाबदारीचं दर्शन घडतं, सामाजिक कार्यांप्रती असलेली त्याची बांधिलकी दिसून येते.

सोनू सूदच्या शब्दांतून गोशाळेतील मानवता, करुणा आणि जबाबदारीचं दर्शन घडतं, सामाजिक कार्यांप्रती असलेली त्याची बांधिलकी दिसून येते.

रविवारी त्यांनी आपल्या द (ट्विटर) अकाउंटवर गायींसोबतचे काही फोटो शेअर केले. रविवारी त्यांनी आपल्या द (ट्विटर) अकाउंटवर गायींसोबतचे काही फोटो शेअर केले. त्या काहीही मागत नाहीत, फक्त काळजी हवी. आमच्या गायी आणि गोशाळांसोबत उभा आहे, असे त्यांनी कॅप्शनमध्ये लिहिले.

सोनू सूद यांचा अलीकडील चित्रपट 'फतेह' जानेवारी २०२५ मध्ये प्रदर्शित झाला. या चित्रपटात जॅकलिन फर्नांडिसही असून, या चित्रपटाद्वारे सोनू सूद यांनी दिग्दर्शनात पदार्पण केले आहे.

सोनू सूद यांचा अलीकडील चित्रपट 'फतेह' जानेवारी २०२५ मध्ये प्रदर्शित झाला. या चित्रपटात जॅकलिन फर्नांडिसही असून, या चित्रपटाद्वारे सोनू सूद यांनी दिग्दर्शनात पदार्पण केले आहे.

# यश स्टार टॉक्सिक चित्रपटातील मेलिसाच्या भूमिकेतील रुक्मिणी वसंतचा फर्स्ट लूक प्रदर्शित...

मुंबई -दक्षिण सुपरस्टार यश अभिनीत बहुप्रतीक्षित 'टॉक्सिक' हा चित्रपट सध्या चर्चेत आहे. या चित्रपटाचा काही दिवसा-पूर्वी टीझर प्रदर्शित करण्यात आला होता. हा टीझर अनेकांना आवडला होता. आता अनेकजण हा चित्रपट पाहण्यासाठी खूप उत्साहित आहेत. चित्रपटाची रिलीज तारीख जवळ येत असताना निर्माते प्रमुख अभिनेत्रींचे फर्स्ट लूक एकामागून एक प्रदर्शित करत आहेत. तारा सुतारियाचा फर्स्ट लूक नुकताच प्रदर्शित करण्यात आला. याशिवाय कियारा अडवाणी, हुमा कुरेशी आणि नयनतारा यांचे फर्स्ट लूकही आधीच प्रदर्शित केले गेले आहेत. आता ६ जानेवारी रोजी 'टॉक्सिक'च्या निर्मात्यांनी साऊथ अभिनेत्री रुक्मिणी वसंतचा फर्स्ट लूक शेअर केला. या चित्रपटात रुक्मिणी वसंतची भूमिका काय असेल याबद्दल आम्ही तुम्हाला सांगणार आहोत.

ज्यामध्ये अभिनेत्री ऑफ-शोल्डर डार्क ड्रेसमध्ये, हातात बंदूक धरून असल्याची दिसली होती. या लूकमध्ये ती खूपच प्रभावी दिसत होती. 'टॉक्सिक' चित्रपटात तारा रेबेकाची भूमिका साकारणार आहे. आता 'टॉक्सिक' या चित्रपटाच्या कहाणीबद्दल अनेकजण उत्सुक आहेत. हा एक मास ॲक्शन चित्रपट असणार आहे.

'टॉक्सिक' चित्रपटाबद्दल : याशिवाय यापूर्वी चित्रपटातील नयनताराचा डॅशिंग फर्स्ट लूक खूप धमाकेदार होता. नयनताराची भूमिका गंगा नावाच्या मुलीची आहे. तसेच या चित्रपटामध्ये हुमा कुरेशी एलिझाबेथची भूमिका साकारणार आहे. याशिवाय कियारा अडवाणी नादियाची भूमिका करणार आहे. 'टॉक्सिक'मधील या चार अभिनेत्रींच्या भूमिका खूपच मनोरंजक, आश्चर्यकारक आणि रहस्यमय आहेत. यश आणि गीतू मोहनदास यांनी 'टॉक्सिक' चित्रपटाचं सहलेखन केलंय. तसेच गीतू मोहनदास यांनी चित्रपटाचे दिग्दर्शन केलं आहे. या चित्रपटाचे निर्माते वेंकट नारायण आणि यश आहेत. हा चित्रपट कन्नड आणि इंग्रजीमध्ये चित्रित करण्यात आला आहे, मात्र हा हिंदी, तेलुगू, तमिळ, मल्याळम आणि इतर अनेक भाषांमध्ये डब केला जाईल.'टॉक्सिक'



रुक्मिणी वसंतचा फर्स्ट लूक : गीतू मोहनदास दिग्दर्शित 'टॉक्सिक' या चित्रपटातील रुक्मिणी वसंतचा फर्स्ट लूक खूपच दमदार आहे.

फर्स्ट लूकमध्ये, रुक्मिणी वसंतनं हिरव्या रंगाचा एक आकर्षक ड्रेस परिधान केला आहे. याशिवाय तिचे केस मागे बांधलेले आहेत आणि तिची ग्लॅमरस स्टाईल ही मोहित करणार आहे. या चित्रपटातील तिच्या पात्राचे नाव मेलिसा आहे. यापूर्वी, तारा सुतारियाचा फर्स्ट लूक प्रदर्शित झाला होता,

१९ मार्च २०२६ रोजी उगादी, गुढी पाडवा आणि ईदच्या निमित्तानं प्रदर्शित होणार आहे. तसेच रणवीर सिंगचा बहुप्रतीक्षित चित्रपट, 'धुरंधर २', देखील त्याच तारखेला प्रदर्शित होईल. 'धुरंधर २' आणि 'टॉक्सिक' यांच्यातील २०२६ मधील आतापर्यंतची सर्वात मोठी टक्कर असण्याची अपेक्षा आहे.



# अमिताभ बच्चन यांचा वारसा पुढे नेणार नाही नातू अगस्त्य नंदा; म्हणाला, ही माझी ओळख नाही, माझे आडनाव



मुंबई,-बॉलीवूड अभिनेते अमिताभ बच्चन यांचा नातू अगस्त्य नंदा सध्या 'इक्कीस' चित्रपटामुळे चर्चेत आहे. त्यामध्ये तो मुख्य भूमिकेत आहे. आजोबा, आजी आणि मामा, मामी यांच्यापाठोपाठ अगस्त्यही आता बॉलीवूडमध्ये सक्रिय असून, त्याने बच्चन कुटुंबीयाच्या अभिनयाच्या वारशाबद्दल प्रतिक्रिया दिली आहे.बऱ्याचदा कलाकारांच्या मुलांवर त्यांच्या कुटुंबीयांतील सदस्यांनी इंडस्ट्रीत कमावलेल्या नावामुळे प्रेशर असतं. त्यामुळे आपसूकच प्रेक्षकांनाही स्टार किडकडून चांगल्या कामाची अपेक्षा असते. अशातच 'आयएमडीबी'च्या मुलाखतीत अगस्त्य नंदाला आई आणि वडील अशा दोन्ही बाजूंनी अभिनयाचा मोठा वारसा असल्याने तुला याचे दडपण येते का, असे विचारले असता अगस्त्यने त्यावर प्रतिक्रिया दिली आहे. माझे आडनाव नंदा आहे – अगस्त्य नंदा अशातच अगस्त्यने यावेळी बच्चन ही त्याची ओळख नसून, त्याचे आडनाव नंदा असल्याचे स्पष्ट केले. अगस्त्य म्हणाला, ''मला दडपण जाणवत नाही. कारण- तो माझा वारसा नाही, असे मला वाटते. माझे आडनाव नंदा आहे. मी आधी माझ्या वडिलांचा मुलगा आहे. त्यामुळे त्यांना अभिमान वाटेल असं काम करण्याचा मी प्रयत्न करीत आहे. तो वारसा मी जाणीवपूर्वक पुढे नेण्याचा प्रयत्न करीत आहे.''अगस्त्य पुढे म्हणाला, ''माझे इतर कुटुंबीय अभिनय क्षेत्रात आहेत, जे कलाकार आहेत. मी त्यांच्या कामाचा आदर करतो आणि मला त्यांचं काम खूप आवडतं. पण, मला नाही वाटत की, मी त्यांच्यासारखा कधी बनू शकेन. त्यामुळे तसा विचार करून वेळ घालवण्यात अर्थ नाही.''

अगस्त्य नंदाची आई श्वेता बच्चन अमिताभ बच्चन यांची मुलगी आहे: तर त्याचे वडील निखिल नंदा यांच्या आई नीतू नंदा या दिवंगत बॉलीवूड अभिनेते राज कपूर यांच्या कन्या आहेत. त्यामुळे अगस्त्यच्या दोन्ही कुटुंबीयांचे अभिनय क्षेत्रात मोठं नाव असल्याने त्याच्याकडूनही प्रेक्षकांना मोठ्या अपेक्षा आहेत.

# दीपिका पदुकोणची शक्तिशाली लाइनअप: किंग आणि ॲटलीचा चित्रपट २०२६ मध्ये धमाल

२०२६ मध्ये मनोरंजन उद्योग एका नवीन आणि रोमांचक युगात प्रवेश करत असताना, मोठे चित्रपट आणि नवीन प्रकारच्या कथा उदयास येत असताना, दीपिका पदुकोण तिच्या केंद्रस्थानी असल्याचे दिसते.

सध्या देशातील दोन मोठ्या चित्रपटांवर काम करत असल्याने, आम्हाला तिचे आणखी चित्रपट पाहण्यास उत्सुकता आहे. अभिनेते जितेंद्र आणि तु-षार कपूर यांनी मुंबईतील ११ मजली व्यावसायिक इमारत ५५९ कोटींना विकली

दीपिकाच्या आगामी चित्रपट यादीत भारतीय चित्रपटसृष्टीतील काही सर्वात मोठ्या प्रकल्पांचा समावेश आहे. एका चित्रपटात ती सहाव्यांदा शाहरुख खानसोबत दिसणार आहे; गेल्या काही वर्षांत त्यांची भागीदारी शाहीपेक्षा कमी झाली नाही. दरम्यान, दीपिका दिग्दर्शक ॲटली आणि अल्लू अर्जुन यांच्यासोबत एक शक्तिशाली संपूर्ण भारतभर चित्रपट बनवण्यासाठी सज्ज आहे. दोन्ही प्रकल्पांमुळे, दीपिका सध्या इंडस्ट्रीतील सर्वात चर्चेत असलेल्या नावांपैकी एक म्हणून स्थापित झाली आहे.

हे वर्ष दीपिकासाठी खूप व्यस्त असणार आहे, कारण तिच्याकडे दोन मोठे मेगा प्रोजेक्ट्स आहेत आणि ती बॉलीवूडची राणी म्हणून सर्वोच्च स्थानावर आहे. मोठ्या सुपरस्टार्ससोबत काम करणे आणि स्वतःची सर्जनशीलता जोडणे असो किंवा स्टार-स्टड ब्लॉकबस्टर चित्रपटांमध्ये तिची उपस्थिती दाखवणे असो, दीपिका आता खरोखरच संपूर्ण भार-तात एक लोकप्रिय घटना बनली आहे.

तिने बॉक्स ऑफिसवर सातत्याने हिट चित्रपट देऊन तिचे राज्य सिद्ध केले आहे, हे सिद्ध करून दिले आहे की ती अजूनही आकड्यांवर नियंत्रण ठेवू शकते. भविष्यात तिच्यासाठी आणखी रोमांचक आशा आहेत आणि प्रत्येकजण ते पाहण्यास उत्सुक आहे.

गेल्या काही वर्षांत, दीपिकाने भव्यता आणि शक्तिशाली आशय यांचा मेळ घालणारी एक फिल्मोग्राफी तयार केली आहे. -ङडज ठए-ऊ दुष्टाचा नाश करण्यासाठी राणी मुखर्जी परत येणार, मर्दानी ३ च्या रिलीजची तारीख जाहीर पद्मावत, जवान आणि फायटरपासून ते कल्की २८९८एडी आणि सिंघम अगेनपर्यंत, तिच्या चित्रपट निवडी नेहमीच सर्जनशील आणि व्यावसायिकदृष्ट्या प्रभावी राहिल्या आहेत. मोठ्या स्टार्ससोबत स्क्रीन शेअर करणे असो किंवा तिच्या उपस्थितीने मोठ्या कथांचे अँकरिंग असो, दीपिका तिच्या शांत पण मजबूत पकडीने प्रत्येक प्रकल्पाला उंचावते. हाच तोल तिला बॉलिवूडची आघाडीची महिला आणि संपूर्ण भारतातील एक घटना म्हणून वेगळे करतो.



पहिला चित्रपट 'किंग' आहे, जो शाहरुख खानसोबत दीपिकाच्या बहुप्रतिक्षित पुनरागमनाचे प्रतीक आहे. हा सहावा चित्रपट एकत्र खास मानला जातो, हा एक पूर्ण-वर्तुळ क्षण आहे जिथे शाहरुख खानसोबत पदार्पण करणाऱ्या अभिनेत्रीने त्याच्यासोबत एक ब्लॉकबस्टर वारसा निर्माण केला आहे. सध्या या चित्रपटाचे चित्रीकरण पोलंडमध्ये सुरू आहे आणि दिवसेंदिवस त्याभोवतीचा उत्साह वाढत आहे.

# विराट आणि अनुष्काने करोडो रुपयांचा प्लॉट खरेदी केला, सेलिब्रिटी या जागेसाठी वेडे का होत आहेत?

सेलिब्रिटी जोडपे विराट कोहली आणि अनुष्का शर्मा यांनी अलिबागमध्ये एक मोठा जमिनीचा तुकडा खरेदी केला आहे, ज्यामुळे त्यांचा लक्झरी रिअल इस्टेट पोर्टफोलिओ आणखी मजबूत झाला आहे. रिअल इस्टेट डेटा ॲनालिटिक्स फर्म उठए मॅट्रिक्सनुसार, या जोडप्याने अलिबागमधील झिरद गावात ३७.८६ कोटींना ५ एकरपेक्षा जास्त जमीन खरेदी केली. मुंबईजवळील हा परिसर त्याच्या सौंदर्य, शांतता आणि गोपनीयतेसाठी ओळखला जातो आणि हे पॉवर कपल येथे त्यांचे नवीन 'दुसरे घर' बांधण्याची योजना आखत आहे.

१३ जानेवारी २०२६ रोजी नोंदणीकृत व्यवहार या करारात दोन वेगवेगळ्या जमिनीच्या भूखंडांची खरेदी समाविष्ट आहे: एक १.४७४ हेक्टर आणि दुसरा ०.६२७ हेक्टर. हा व्यवहार १३ जानेवारी २०२६ रोजी पूर्णपणे नोंदणीकृत झाला, ज्यावर २.२७ कोटी स्टॅम्प ड्युटी आणि ३०,००० नोंदणी शुल्क आकारले गेले. गेल्या चार वर्षांत अलिबागमध्ये या जोडप्याची ही दुसरी मोठी गुंतवणूक आहे, जी या प्रदेशाची वाढती लोकप्रियता दर्शवते.

अलिबाग आता फक्त आठवड्याच्या शेवटी सुट्टी घालवण्यासाठी जाणारे ठिकाण राहिलेले नाही, तर ते



लक्झरी रिअल इस्टेटचे प्रमुख केंद्र बनले आहे. गेल्या काही वर्षांत येथील मालमत्तेच्या किमती वाढल्या आहेत. अपार्टमेंटचे भांडवली मूल्य १५,००० ते १७,००० प्रति चौरस फूट आहे, तर शेतीची जमीन ३ कोटी ते ५ कोटी प्रति एकर या दराने विकली जात आहे. दरम्यान, निवासी बांधकामासाठी योग्य असलेल्या भूखंडांच्या किमती ८ कोटी ते १० कोटी प्रति एकरपर्यंत पोहोचल्या आहेत. या प्रदेशाची वाढती लोकप्रियता मुख्यत्वे मोठ्या सेलिब्रिटी आणि अब्जाधीशांच्या गुंतवणुकीमुळे आहे. विराट आणि अनुष्का व्यतिरिक्त, अमिताभ बच्चन आणि शाहरुख खान सारख्या स्टार्सनीही अलिबागमध्ये मालमत्तांमध्ये गुंतवणूक केली आहे. याव्यतिरिक्त, गोपनीयतेची इच्छा, शांत वातावरण आणि मुंबईच्या गजबजाटापासून दूर असलेल्या समुद्रकिनाऱ्यावरील आलिशान जीवनशैलीमुळे अलिबाग उच्च संपत्ती असलेल्या व्यक्ती (क्छखी) आणि चित्रपट कलाकारांसाठी पसंतीचा पर्याय बनला आहे.अलिबागमधील जमिनीच्या किमती सतत वाढत आहेत आणि प्रत्येक मोठे नाव या समुद्रकिनाऱ्यावरील परिसरात स्वतःचा स्वर्गाचा छोटासा तुकडा शोधत आहे. विराट कोहली आणि अनुष्का शर्मा यांनी केलेली ही नवीन गुंतवणूक अलिबाग आता एक लक्झरी रिअल इस्टेट हॉटस्पॉट बनले आहे, जे शांतता, सौंदर्य आणि गोपनीयतेचे मिश्रण देते, याचे लक्षण आहे.

# वायकोला वाचवण्यासाठी अल्लू अर्जुन अक्षरश जोडले हात !

मुंबई,-चाहत्यांमधील प्रचंड उत्साह आणि त्यांच्या आवडत्या कलाकाराला पाहण्यासाठी होणारी गर्दी ही बऱ्याचदा कलाकारांसाठी एक मोठा चांगला अनुभव असतो. परंतु, याच गर्दीमुळे अनेक वेळा कलाकारांना अडचणींना सामोरे जावे लागते. काही महिन्यांपूर्वी अभिनेत्री निधी अग्रवाल आणि समांथा प्रभू यांच्याबद्दल असाच एक प्रकार घडला होता. दोघींच्या भोवती इतकी गर्दी झाली होती की त्यांना बाहेर पडणे अशक्य झाले होते. या गर्दीतून त्यांना कॅमेरा क्रू आणि सुरक्षा रक्षकांच्या मदतीने बाहेर काढण्यात आले. त्यानंतर, आता अभिनेता अल्लू अर्जुनची गर्दीमध्ये अडकलेली स्थिती चर्चेत आली आहे. अल्लू अर्जुन आणि त्याची पत्नी स्नेहा रेड्डी हे हैदराबादमधील प्रसिद्ध कॅफे निलोफरमध्ये गेले होते, आणि त्यांना पाहण्यासाठी त्यांच्या चाहत्यांनी गर्दी केली. गर्दीमुळे, नुसते अल्लू अर्जुनच नाही तर त्याची पत्नी स्नेहा देखील या धक्काबुक्कीच्या आणि राक्षसी गर्दीचा शिकार झाली.

व्हायरल झालेल्या एका व्हिडिओमध्ये, अल्लू अर्जुन आणि स्नेहा यांना गर्दीतून बाहेर पडताना स्पष्टपणे दिसले. यावेळी, अल्लू अर्जुन त्याच्या पत्नीचा हात पकडून गर्दीमधून मार्ग काढत होता. त्यानंतर, अल्लू अर्जुन आपल्या चाहत्यांना रस्ता मोकळा करण्याची विनंती करत, त्याच्या पत्नीला सुरक्षितपणे कारमध्ये बसवण्यासाठी प्रयत्न करत होता. व्हिडिओमध्ये त्याला पाहता येतं की, अल्लू अर्जुन चाहत्यांना रस्ता सोडून मागे हटण्याची विनंती करत आहे. वहानाच्या सुरक्षेसाठी कॅफे कर्मचारी देखील मदतीला आले होते. त्यांनी फोर्सचा उपयोग करून गर्दीला बाजूला करायला मदत केली, त्यामुळे स्नेहा आणि अल्लू अर्जुनांना काही प्रमाणात सुरक्षितता मिळाली. परंतु, तरीही, गर्दीचा एक मोठा भाग त्यांची गाडी पिळून घेण्याचा प्रयत्न करत होता. काही चाहत्यांनी गाडीच्या मागे धाव घेतली आणि फोटो काढण्याचा प्रयत्न करत होते, हे देखील व्हिडिओमध्ये दिसून आले.अल्लू अर्जुनने पुन्हा एकदा रस्ता मोकळा करण्यासाठी त्याच्या चाहत्यांना आग्रह केला. त्याच्या पत्नीला सुरक्षितपणे गाडीत बसवले गेल्यानंतर, अल्लू अर्जुनने सर्व चाहत्यांचा निरोप घेतला आणि ते दोघे गाडीमध्ये बसून निघून गेले.

यापूर्वी, 'पुष्पा' च्या प्रीमियरच्या वेळी देखील, अल्लू अर्जुनच्या भोवती गर्दी केली गेली होती. त्या वेळी एक महिला चेंगराचेंगरीत मृत्यू पावली होती, आणि या प्रकरणामुळे भारतीय चित्रपटसृष्टीत एक मोठा वाद निर्माण झाला होता. त्या घटनेनंतर अल्लू अर्जुनला तात्काळ जेलमध्ये ताब्यात घेतले गेले होते, कारण गर्दीचे नियंत्रण ठेवण्यात अयशस्वी होणाऱ्या घटनांचा तो एक भाग ठरला होता.यादरम्यान, 'पुष्पा २' च्या प्रीमियरनंतर एका महत्त्वपूर्ण घटनेने आणखी एक धक्का दिला होता, आणि अल्लू अर्जुनच्या सुरक्षा व्यवस्थेमध्ये बऱ्याच सुधारणा करण्याची गरज निर्माण झाली होती. तथापि, आजही त्याच्या चाहत्यांमध्ये त्याच्या प्रेमात वेगाने वाढ होत आहे.आता, अल्लू अर्जुनच्या चाहत्यांना त्याच्या आवाजाने आणि अभिनयाने जो कनेक्शन मिळालं आहे, ते आजही कायम आहे. त्याच्या लोकप्रियतेचा ठसा आता भारतापुरता नाही, तर जागतिक स्तरावर सुद्धा पडलेला आहे. तथापि, असे प्रकरण आणि गर्दींच्या कारणांमुळे कलाकारांची सुरक्षा ही एक महत्त्वाचा मुद्दा बनलेला आहे.



## लातूर जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीसाठी जिल्हास्तरीय आदर्श आचारसंहिता कक्ष कार्यान्वित

**लातूर/प्रतिनिधी :** राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणुकीसाठी १३ जानेवारी २०२६ पासून आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. न्याय्य, नि:पक्षपाती आणि पारदर्शक वातावरणात निवडणुका पार पाडण्यासाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या आदेशाने जिल्हा परिषद कार्यालयात जिल्हास्तरीय आदर्श आचारसंहिता कक्ष स्थापन करण्यात आला आहे. या कक्षाचे नोडल अधिकारी म्हणून जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ए. जे. तडवी यांची, तर सहायक नोडल अधिकारी म्हणून महिला व बाल कल्याण विभागाचे जिल्हा कार्यक्रम अधिकारी जावेद शेख यांच्यावर जबाबदारी सोपविण्यात आली आहे. या कक्षात प्रदीप बोंबले, बालाजी पोतदार, विष्णू शिंदे, राहुल सुतार आणि गणेश लोणकर यांचा समावेश आहे. तसेच, प्रत्येक तालुकास्तरावर संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या अधिनस्त आदर्श आचारसंहिता कक्ष स्थापन करण्यात आले आहेत. निवडणूक प्रक्रियेदरम्यान आचारसंहितेचे कोणतेही उल्लंघन आढळल्यास नागरिकांनी त्वरित जिल्हा आदर्श आचारसंहिता कक्षाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. निवडणूक घोषित झाल्यापासून सर्व राजकीय पक्ष, उमेदवार आणि इतर संबंधित व्यक्तींनी आदर्श आचारसंहितेचे काटेकोर पालन करणे अनिवार्य आहे.

## डॉ .बालाजी कळंबे यांची ३६ व्या महाराष्ट्र वाणिज्य परिषदेच्या अध्यक्षपदी निवड

**लातूर/प्रतिनिधी :** दयानंद शिक्षण संस्था संचलित, दयानंद वाणिज्य महाविद्यालयातील वाणिज्य विभागाचे प्राध्यापक डॉ. बालाजी कळंबे यांची ३६ व्या महाराष्ट्र वाणिज्य परिषदेच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. वाणिज्य शिक्षण व संशोधन क्षेत्रातील हा अत्यंत मानाचा गौरव समजला जातो. विशेष म्हणजे, तब्बल २२ वर्षांनंतर हा बहुमान दयानंद वाणिज्य महाविद्यालयाला प्राप्त झाला असून, या निवडीमुळे संपूर्ण मराठवाड्याच्या शैक्षणिक वर्तुळातून डॉ. कळंबे यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.



ही परिषद मुंबईतील कांदिवली एज्युकेशन सोसायटीचे बी. के. श्रॉफ कला महाविद्यालय व एम. एच. श्रॉफ वाणिज्य महाविद्यालय येथे १७ व १८ जानेवारी २०२६ रोजी आयोजित करण्यात येणार आहे. या महत्त्वपूर्ण परिषदेत देशभरातील वाणिज्य शाखेतील नामवंत प्राध्यापक, संशोधक व तज्ज्ञ अभ्यासक सहभागी होऊन वाणिज्य क्षेत्रातील विविध विषयांवर मंथन करणार आहेत.

डॉ. बालाजी कळंबे हे वाणिज्य शिक्षण, संशोधन व शैक्षणिक प्रशासन या क्षेत्रातील एक अभ्यासू आणि दूरदृष्टी असलेले व्यक्तिमत्व म्हणून ओळखले जातात. त्यांनी आजवर अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय शैक्षणिक परिषदांमध्ये महत्त्वपूर्ण शोधनिबंध सादर केले आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक विद्यार्थ्यांनी संशोधन क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन केले आहे. डॉ. कळंबे यांच्या प्रदीर्घ अनुभवाचा लाभ महाराष्ट्रातील वाणिज्य शिक्षणाची गुणवत्ता वाढवण्यासाठी निश्चितच होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. या निवडीबद्दल दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. लक्ष्मीरमण लाहोटी, सचिव श्री. रमेश बियाणी, दयानंद कला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड, दयानंद वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर, तसेच महाविद्यालयातील प्राध्यापकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी डॉ. कळंबे यांचे अभिनंदन केले आहे. या निवडीमुळे शैक्षणिक आणि वाणिज्य क्षेत्रातून मोठे समाधान व्यक्त होत आहे.

## 'मिस्टर परफेक्शनिस्ट'चे मराठी

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्रातील २९ महानगरपालिकासाठी मतदान पार पडले आहे. मुंबईत अनेक सेलिब्रिटी मंडळीही आपला मतदानाचा हक्क बजावताना पाहायला मिळाली. अशातच अभिनेता आमिर खानही त्याचे मत देऊन बाहेर आला. तेव्हा त्याच्यासोबत एक घटना घडली, जी सध्या तुफान व्हायरल होत आहे.आमिर खाननेही आपला मतदानाचा हक्क बजावला. मात्र, मतदान केंद्राबाहेर माध्यमांशी संवाद साधताना आमिरने जे विधान केले, त्याने सर्वांचेच लक्ष वेधून घेतले आहे. यावेळी आमिर मराठीत बोलत होता. आमिरला मराठीत बोलताना पाहून एका पत्रकाराने त्याला विनंती केली सर, कृपया हिंदीतही बोला (देशासाठी). यावर आमिरने क्षणाचाही विलंब न लावता म्हटले, हिंदीत कशाला? हा महाराष्ट्र आहे भाऊ. आमिरचे हे उत्तर ऐकून तिथे उपस्थित असलेले सर्वच जण अवाक झाले. जेव्हा पत्रकाराने त्याला पुन्हा सांगितले की, हा व्हीडीओ दिल्लीसह देशभरातील प्रेक्षक पाहत आहेत, तेव्हा आमिरने हसून हिंदीतही आपली प्रतिक्रिया दिली.

### लातूर महानगरपालिका निवडणुकीतील काँग्रेस व वंचित बहुजन आघाडीच्या

# ऐतिहासीक विजयाचे शिल्पकार लातूरकरच... सर्वांचे मन:पूर्वक आभार- आ. अमित देशमुख

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर महानगरपालीका निवडणुकीत काँग्रेस आणि वंचित बहूजन आघाडीने ७० पैकी तब्बल ४७ जागा जिंकून ऐतिहासिक विजय मिळवला आहे, या सर्व विजयाचे श्रेय लातूरकरांचे आहे यामुळे त्यांचे मनपुर्वक आभारी असल्याचे नमूद करुन लातूरकरांनी दाखवलेला हा विश्वास सार्थ ठरवण्यासाठी निवडूण आलेल्या सहकाऱ्यासह आम्ही सर्वजण कायम प्रयत्नशील राहणाार असल्याचे माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांनी म्हटले आहे.





लातूर महानगरपालीका निवडणुकीत काँग्रेस आणि वंचित बहूजन आघाडीला भरघोस यश मिळालेले असतांना या निवडणुकीच्या प्रचाराची एकहाती धुरा सांभाळणारे काँग्रेस पक्षाचे नेते माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांनी म्हटले आहे की, लातूरची जनता शांत, सुसंस्कृत आणि विकासाभिमुख असल्याचे पून्हा एकदा सिध्द झाले आहे. महायुतीमधील भारतीय जनता पक्ष आणि इतर घटक पक्षाच्या मंडळीनी इतर शहराप्रमाणे लातूरमध्ये येवून वादग्रस्थ वकतव्य केली, अफवा पसरवून समाजासमाजात व्देष पसरवून फुट पाडण्याचे प्रयत्न केले. येथील जनतेने हे सर्व प्रयत्न उधळून लावल्याचे स्पष्ट झाले आहे. लातूर हे विविधतेने नटललेले सामाजिक एकोपा जपणारे शहर आहे. या निवडणुकीत काँग्रेस पक्षाने वंचित बहूजन आघाडी सोबत शहराच्या वैशिष्ट्याला अनुरुप ठरणारी आघाडी केली. ही आघाडी लातूरकरांना मनपासुन पसंद पडल्याचे या निकालातून स्पष्ट झाले आहे.

आदरणीय शिवराज पाटील चाकूरकर, आदरणीय शिवाजीराव पाटील निलंगेकर, आदरणीय विलासराव देशमुख साहेब या नेत्यांनी लातूरचे हे वेगळेपण जोपासत विकास प्रक्रीयेला गती दिली आहे. आदरणीय दिलीपराव देयामुख साहेब यांच्या नेतृत्वात आणि ते काम पूढे नेण्याचा प्रयत्न करीत आहोत. असे असतांना येथील आदरणीय नेत्याच्या आठवणी पूसण्याचे वक्तव्य करण्याचे धाडस भाजपच्या नेते मंडळींनी केले. त्यांनाही लातूरच्या जनतेने या निकालातून योग्य संदेश दिला आहे.

लातूर हे मराठवाडयात अत्यंत गतीमान पध्दतीने विकसीत होत असलेले शहर आहे. या विकास प्रक्रीयेला बळकटी देणारा जनतेच्या सुचना घेवून तयार केलेला पंचसुत्री जाहीरनामा काँग्रेस आणि वंचित बहूजन आघाडीने या निवडणुकीत जनतेसमोर ठेवला. जनतेकडून या जाहीरनामाला उस्फुर्त प्रतिसाद मिहाळा असून त्यांची कालबध्द अमंलबजावणी करण्याचे आम्ही ठरवले असल्याचे आमदार देशमुख यांनी म्हटले आहे.

लातूर महानगरपालीका निवडणुकी दरम्यान काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष आदरणीय मल्लीकार्जून खरगे, लोकसभेतील विरोधी पक्षनेते खासदार राहूल गांधी, प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्यासह अनेक नेत्यांनी भक्कम पाठबळ दिले, वंचित बहूजन आघाडीचे नेते आदरणीय प्रकाश उर्फ बाळासाहेब आंबेडकर, आदरणीय दिलीपराव देशमुख, खासदार डॉ. शिवाजी काळगे, माजी आमदार जिल्हा बॅकेचे चेअरमन धिरज देशमुख, वंचित बहूजन आघाडीचे युवा नेतेचे सुजात आंबेडकर, प्रदेया सचिव मुफती वसीम सय्यद, काँग्रेस पक्षाचे सरचिटणीस जिंतेद्र देहाडे, भाऊसाहेब आजबे, स्टार प्रचारक हनुमंत पवार यांनी प्रचार सभा घेतल्या. माजी मंत्री बाळासाहेब थोरात, माजी मंत्री विजय वडडेटीवार, माजी मंत्री सतेज पाटील यांच्यासह अनेक नेत्यांनी सोशल मिडीयाच्या माध्यमातून आवाहन करुन प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सहकार्य केले. स्थानीक काँग्रेस आणि वंचित बहूजन आघाडीच्या पदाधिकारी, कार्यकर्ते यांनी अहोरात्र परिश्रम केले या सर्वांचे आभार व्यक्त करीत असल्याचे माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांनी म्हटले आहे.

## 'हिंद-दी-चादर' श्री गुरू तेग बहादुर यांचे ३५० व्या शहीदी समागम वर्ष कार्यक्रमाविषयी लातूर जिल्ह्यात शाळा, महाविद्यालयांमध्ये जनजागृतीस प्रारंभ

**लातूर/प्रतिनिधी :** 'हिंद-दी-चादर' श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त नांदेड येथे २४ व २५ जानेवारी रोजी कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमाची व श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या कार्याची माहिती घरोघरी पोहोचविण्यासाठी शिक्षण विभागामार्फत विशेष जनजागृती मोहीम हाती घेण्यात आली आहे. या मोहिमेंतर्गत शाळा, महाविद्यालयांमध्ये श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या जीवनावर आधारित माहितीपट, गीत दाखविणे यासह विविध स्पर्धांचे आयोजन केले जात आहे.




लातूर जिल्ह्यातील शाळांमध्ये आजपासून सुरु झालेल्या या उपक्रमात विद्यार्थ्यांना शाळेतील एलईडी स्क्रीनच्या माध्यमातून हिंद दी चादर श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या जीवनावर आधारित माहितीपट आणि गीत दाखविण्यात आले. तसेच काही शाळांमधील विद्यार्थ्यांनी या गीताचे सामूहिक गायन केले. जिल्हा परिषद शाळांसोबतच जिल्ह्यातील शासकीय, निमशासकीय, खासगी शाळांमध्ये हा उपक्रम राबविण्यात आला. हिंद दी चादर श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांचा इतिहास विद्यार्थ्यांपर्यंत पोहचावा, यासाठी याविषयावरील चित्रकला, गायन, निबंध आणि वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन शाळा, महाविद्यालयांमध्ये केले जाणार आहे. या स्पर्धांमध्ये सहभागी सर्व विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित केले जाईल.

## कल्याण-डोंबिवलीमध्ये फॅमिली ड्रामा, एकाच कुटुंबातील तिघे ३ पक्षांकडून विजयी!

**डोंबिवली /प्रतिनिधी :** कल्याण-डोंबिवली महानगरपालिका निवडणुकीमध्ये भाजप-शिवसेना महायुतीने दणका उडवून दिला आहे. डोंबिवलीमध्ये तर एकाच कुटुंबातील तिघे उमेदवार वेगवेगळ्या पक्षांच्या तिकीटावर निवडणूक लढत होते, या तिघांनाही विजय मिळाला आहे. डोंबिवलीमधल्या पॅनल २१ मधून म्हात्रे कुटुंबातील तिघांचा विजय झाला आहे.

पॅनल २१ अ मधून मनसेचे प्रल्हाद म्हात्रे, २१ ब मधून भाजपच्या डॉ. रविना राहुल म्हात्रे आणि २१ क मधून शिवसेना शिंदे गटाच्या रेखा म्हात्रे विजयी झाल्या आहेत. हे तिघेही एकाच कुटुंबातील असूनही वेगवेगळ्या पक्षातून निवडणूक लढले होते. म्हात्रे कुटुंबामध्ये प्रल्हाद म्हात्रे हे दीर, रेखा म्हात्रे या भावजय आणि रविना म्हात्रे या सूनबाई आहेत. आता हे तिघेही वेगवेगळ्या पक्षाच्या नगरसेवक म्हणून कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या सभागृहामध्ये बसणार आहेत.

## 'हिंद-दी-चादर'च्या स्मृतींनी शाळा-महाविद्यालये भारावली; लातूर आणि धाराशिवमध्ये जनजागृतीचा उत्साह

**लातूर/प्रतिनिधी :** धर्म, सत्य आणि मानवी हक्कांच्या रक्षणासाठी सर्वोच्च बलिदान देणारे 'हिंद-दी-चादर' श्री गुरू तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षाचे औचित्य साधत लातूर आणि धाराशिव जिल्ह्यात शालेय स्तरावर व्यापक जनजागृती मोहीम राबविण्यात येत आहे. नांदेड येथे होणाऱ्या ऐतिहासिक मुख्य सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर, शिक्षण विभागाने आयोजित केलेल्या या उपक्रमास विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.



**लातूर: डिजिटल सादरीकरणातून इतिहासाचा जागर**

जिल्ह्यातील शाळांमध्ये आजपासून विशेष उपक्रमांना प्रारंभ झाला. शासकीय आणि खासगी शाळांमधील विद्यार्थ्यांना एलईडी स्क्रीनद्वारे गुरुजींच्या जीवनपटावर आधारित माहितीपट () दाखविण्यात आले. यावेळी शाळांचा परिसर 'हिंद दी चादर' गीतांच्या सामूहिक गायनाने दुमदुमून गेला. केवळ पुस्तकी ज्ञान न देता, दृक-श्राव्य माध्यमातून गुरुजींचा त्याग विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबवण्याचा प्रयत्न शिक्षण विभागाने केला आहे.

**धाराशिव: प्रभात फेरीने वेधले लक्ष**

धाराशिव जिल्ह्यातील शिंगोली (ता. जि. धाराशिव) येथील विद्यानिकेतन माध्यमिक व आदर्श प्राथमिक आश्रमशाळेत गुरुजींना अनोखी आदरांजली वाहण्यात आली. शाळेचे शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी भव्य 'प्रभात फेरी' काढत परिसरात जनजागृती केली. कार्यक्रमात श्रीमती ज्योती राठोड यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले. यावेळी रत्नाकर पाटील यांनी गुरुजींच्या बलिदानाचे महत्त्व विशद करताना, ''अन्यायाविरुद्ध लढणारे हिंद-दी-चादर म्हणजे देशाचा गौरव,'' अशा शब्दांत त्यांच्या कार्याचा गौरव केला.

**स्पर्धांमधून गुणांचा सन्मान**

दोन्ही जिल्ह्यांत निबंध, चित्रकला, वक्तृत्व आणि गायन स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. यात सहभागी विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. हिंद दी चादर श्री गुरू तेग बहादूरजींचा ज्वलंत इतिहास नव्या पिढीपर्यंत पोहोचविणे, हाच या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे.

## कॉटन सॅनिटरी पॅड वापरणे आरोग्य व पर्यावरणासाठी आवश्यक - डॉ. अंजली जोशी

**लातूर/प्रतिनिधी :** दयानंद कला महाविद्यालयाच्या अंतर्गत तक्रार निवारण समितीच्या वतीने आणि प्राचार्य डॉ शिवाजी गायकवाड यांच्या मार्गदर्शनानुसार,मासिक पाळीतील सॅनिटरी पॅड जनजागृती या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेत कॅन्सर मुक्त भारत अभियान अंतर्गत सौ. मोनिका सूर्यवंशी व सौ. स्मिता शिरोळे यांनी कॉटन सॅनिटरी पॅडचे महत्त्व स्पष्ट केले.

कार्यशाळेत बाजारात मिळणाऱ्या नामांकित कंपन्यांच्या सॅनिटरी पॅड्स व कॉटन पॅड्स यांची तुलनात्मक प्रात्यक्षिके सादर करण्यात आली. प्लास्टिकयुक्त पॅड्समुळे महिलांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होऊ शकतो, तसेच खाज, इन्फेक्शन व त्वचारोगासारख्या समस्या निर्माण होतात, असे यावेळी सांगण्यात आले.




समारोपप्रसंगी अध्यक्षीय भाषणात डॉ. अंजली जोशी (उपप्राचार्य, दयानंद कला महाविद्यालय) यांनी प्लॅस्टिकचा वापर टाळून कॉटन पॅड्स वापरण्याचे आवाहन केले. प्लास्टिक पॅड्स पर्यावरणासाठी घातक असून त्यांची विल्हेवाट योग्य पद्धतीने लावणे आवश्यक आहे, असेही त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाची प्रस्तावना व सूत्रसंचालन डॉ. दुर्गा शर्मा यांनी केले, तर आभारप्रदर्शन डॉ. अंजली जोशी यांनी केले. कार्यक्रमास महाविद्यालयातील महिला प्राध्यापक, प्रशासकीय महिला कर्मचारी व विद्यार्थीनी यांची बहुसंख्येने उपस्थित होती.



# लातूरच्या नागरिकांनी भाजपचे असंस्कृत राजकारण हाणून पाडले

## माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांनी लातूरकरांचे मानले जाहीर आभार

**लातूर/प्रतिनिधीः** शांत सुरक्षित आणि सुसंस्कृत लातूर असंस्कृत राजकारण स्विकारत नाही हे येथील जनतेने महानगरपालिका निवडणुकीच्या माध्यमातून दाखवून दिले आहे असे नमूद करून या निवडणुकीत काँग्रेस वंचित बहुजन आघाडीला विक्रमी ऐतिहासिक विजय मिळवून दिल्याबद्दल माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांनी लातूरकरांचे जाहीर आभार मानले.

लातूर महानगरपालिका निवडणुकीत काँग्रेस वंचित बहुजन आघाडीने ७० पैकी ४७ जागा जिंकून ऐतिहासिक विजय संपादन केल्यानंतर, आज दुपारी दोन्ही पक्षाच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांनी शहरातील सर्व महापुरुषांच्या पुतळ्यांना अभिवादन केले, त्यानंतर शहरात ठिकठिकाणी जल्लोष



साजरा केला, सायंकाळी सर्व विजयी उमेदवार, पदाधिकारी, कार्यकर्ते काँग्रेस भवन येथे एकत्र झाले असता माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांनी या जल्लोषातत सहभागी होऊन सर्वांचे अभिनंदन केले लातूरकरांचे जाहीर आभार मानले.

याप्रसंगी खासदार मा.डॉ. शिवाजी काळगे, माजी आमदार, जिल्हा बँकेचे अध्यक्ष श्री धीरज देशमुख, जिल्हा काँग्रेस अध्यक्ष श्री. अभय साळुंखे, शहर जिल्हा काँग्रेस अध्यक्ष ड. किरण जाधव, सौ. अदिती देशमुख यांच्यासह मोठ्या संख्येने पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

याप्रसंगी बोलताना माजी मंत्री आमदार देशमुख म्हणाले की, महाराष्ट्रातील शांत सुरक्षित, विकसित शहर म्हणून ओळख असलेल्या लातूरमध्ये महानगरपालिका निवडणूक काळात भाजपच्या नेत्यांनी व पदाधिकाऱ्यांनी येथे येऊन द्वेषाचे राजकारण केले.

येथील नेतृत्वाबद्दल असंस्कृत वक्तव्य केली, संपूर्ण लातूरला एक कुटुंब म्हणून सांभाळणारे आदरणीय शिवराज पाटील चाकूरकर साहेब, आदरणीय शिवाजीराव पाटील निलंगेकर साहेब, आदरणीय विलासरावजी देशमुख साहेब यांच्या आठवणी लातूरकरांच्या मनावर कोरलेल्या आहेत. त्या कधीही पुसणार नाही हे ह्या निवडणुकीच्या निमित्ताने लातूरकरांनी दाखवून दिले आहे.

देशात आणि राज्यात एकत्र सरकारमध्ये असलेल्या भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) या पक्षाच्या नेत्यांनी कटकारस्थान करून या निवडणुकीत काँग्रेस पक्षाच्या मताची विभागणी करण्याचा प्रयत्न केला परंतु हा प्रयत्नही लातूरकरांनी हाणून पाडला आहे, काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडीच्या पदाधिकारी कार्यकर्त्यांनी अहोरात्र परिश्रम घेऊन पक्षाला विजय मिळवून दिला आहे. त्यामुळे या निवडणुकीतील त्यांचे योगदान खूप मोठे आहे, अनेक इच्छुकांनी या पक्षाकडे उमेदवारी मागितली होती मात्र ज्यांना उमेदवारी मिळाली नाही त्यांनी बंडखोरीचा मार्ग न स्वीकारता पक्षासाठी काम केले, ज्यांनी ज्यांनी पक्षासाठी या निवडणुकीत योगदान दिले त्या सर्वांसाठी पक्ष सकारात्मक विचार करून योग्य वेळी योग्य संधी देण्याचा प्रयत्न करणार असल्याचेही माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी यावेळी बोलताना सांगितले.

## लातूर महानगरपालिका २०२६ विजयी उमेदवार

### प्रभाग क्रमांक १

एकूण मतदान :१३५१६

| नाव | पक्ष | मत |
|---|---|---|
| मनोज अरुण थोरात | (काँग्रेस) | मत : ६४९४ |
| चंद्रकला महादेव मदने | (काँग्रेस) | मत : ५८७६ |
| तबसुम आरीफ शेख | (काँग्रेस) | मत : ४४९५ |
| देविदास रामलिंग काळे | (भाजपा) | मत : ४७७० |

### प्रभाग क्रमांक २

एकूण मतदान :११६२२

| नाव | पक्ष | मत |
|---|---|---|
| अंकिता प्रशांत भडीकर | (वंचित) | मत : ४३९० |
| सचिन श्रीरंग बंडापल्ले | (काँग्रेस) | मत : ४९०३ |
| शहनाज आसिफ गोलंदाज | (काँग्रेस) | मत : ४६५१ |
| फारुख कासीमसाब शेख | (काँग्रेस) | मत : ४१६१ |

### प्रभाग क्रमांक ३

एकूण मतदान :१०६८९

| नाव | पक्ष | मत |
|---|---|---|
| मनिषा संभाजी बसपुरे | (काँग्रेस) | मत : ४७३१ |
| विजयमुकार साबदे | (काँग्रेस) | मत :३८३२ |
| जरीनाबी शेख | (काँग्रेस) | मत : ३९५१ |
| विकास सतीश कांबळे | (काँग्रेस) | मत : ४५८३ |

### प्रभाग क्रमांक ४

एकूण मतदान :१२८८०

| नाव | पक्ष | मत |
|---|---|---|
| सचिन गायकवाड | (वंचित) | मत : ५५६८ |
| गोरीबा असेफ बागवान | (काँग्रेस) | वोट : ५३९४ |
| कौसर शेख | (काँग्रेस) | वोट : ५३८९ |
| अहेमदखॉ पठाण | (काँग्रेस) | वोट : ४५५४ |

### प्रभाग क्रमांक ०५

एकूण मतदान :१०९०४

| नाव | पक्ष | मत |
|---|---|---|
| विक्रांत विक्रम गोजमगुंडे | (राकॉ अप) | मत : ४७२९ |
| नसरिन असलम शेख | (काँग्रेस) | मत : ४७४१ |
| सुरेखा नामदेव इगे | (काँग्रेस) | मत : ५२४० |
| मंगेश दिलीप सोनकांबळे | (काँग्रेस) | मत : ४५६९ |

### प्रभाग क्रमांक ०६

एकूण मतदान :१०२२४

| नाव | पक्ष | मत |
|---|---|---|
| गणेश ईश्वरअप्पा गवारे | (भाजपा) | मत : ४७२५ |
| ज्योती दीपक आवसकर | (भाजपा) | मत : ४५०८ |
| मंजुळा अग्रवाल | (काँग्रेस) | मत : ४६२३ |
| गिरीष गुरुनाथअप्पा ब्याळे | (काँग्रेस) | मत : ३६४४ |

### प्रभाग क्रमांक ०७

एकूण मतदान :११४१०

| नाव | पक्ष | मत |
|---|---|---|
| निकीता रोहीत सोमवंशी | (वंचित) | मत : ४६७६ |
| रूबीना सुलेमा तांबोळी | (काँग्रेस) | मत : ८२३८ |
| ॲड. अतिष चद्रकांत चिकटे | (काँग्रेस) | मत : ५९२९ |
| मोमीन युनुस महमद युसूफ | (काँग्रेस) | मत : ५२३८ |

### प्रभाग क्रमांक ०८

एकूण मतदान :१२८९९

| नाव | पक्ष | मत |
|---|---|---|
| अभिषेक राजेंद्र पतंगे | (काँग्रेस) | मत : ६४४० |
| झिपरे श्रावणी बालाजी | (काँग्रेस) | मत : ६६०९ |
| घंटे रिहानबेगम ताहेरअली | (काँग्रेस) | मत : ५५१८ |
| उटगे स्नेहल श्रीकांत | (काँग्रेस) | मत : ४६७९ |

### प्रभाग क्रमांक ०९

एकूण मतदान :१२५३६

| नाव | पक्ष | मत |
|---|---|---|
| तबसुम मुख्तार शेख | (काँग्रेस) | मत : ५७९७ |
| योगेश उमाकांत स्वामी | (काँग्रेस) | मत : ४२५५ |
| सपना पांडूरंग किसवे | (काँग्रेस) | मत : ६४४४ |
| इसरार जब्बार सगरे | (काँग्रेस) | मत : ६१७० |

### प्रभाग क्रमांक १०

एकूण मतदान :१०७३५

| नाव | पक्ष | मत |
|---|---|---|
| कांचन रत्नदिप अजनिकर | (काँग्रेस) | मत : ५२९८ |
| सुकेशनी मुस्कावाडा | (काँग्रेस) | मत : ४९२८ |
| दिपक गंगाधर सुळ | (काँग्रेस) | मत : ५४३२ |
| डॉ. बालाजी सोळुंके | (काँग्रेस) | मत : ४६३३ |

### प्रभाग क्रमांक ११

एकूण मतदान :९३१९

| नाव | पक्ष | मत |
|---|---|---|
| विकास वाघमारे | (काँग्रेस) | मत : ५१७१ |
| छाया रंगराव बंडगर | (काँग्रेस) | मत : ४९८२ |
| रागिनी सतीश यादव | (भाजपा) | मत : ४६२२ |
| पवन भानुदास सोलंकर | (काँग्रेस) | मत : ४७२५ |

### प्रभाग क्रमांक १२

एकूण मतदान :१११८५

| नाव | पक्ष | मत |
|---|---|---|
| जयश्री भालचंद्र सोनकांबळे | (काँग्रेस) | मत : ५००६ |
| धोंडीराम रघुनाथ यादव | (काँग्रेस) | मत : ५६९८ |
| फिरदोस अरीफ शेख | (काँग्रेस) | मत : ५१७८ |
| सतीश सांळुखे | (काँग्रेस) | मत : ५४३० |

### प्रभाग क्रमांक १३

एकूण मतदान :१०३१०

| नाव | पक्ष | मत |
|---|---|---|
| अमोल दगडू लांडगे | (वंचित) | मत : ३७३२ |
| शाहीन आयुब मणियार | (काँग्रेस) | मत : ४५४८ |
| कमल त्रिंबक सोमवंशी | (काँग्रेस) | मत : ३८९० |
| बालासाहेब देशमुख | (काँग्रेस) | मत :४२६३ |

### प्रभाग क्रमांक १४

एकूण मतदान :९५३८

| नाव | पक्ष | मत |
|---|---|---|
| करुणा मोहन शिंदे | (भाजपा) | मत : ४३५८ |
| उद्धव बापुराव तेलंगे | (भाजपा) | मत : ४५७२ |
| स्वाती प्रवीण घोरपडे | (भाजपा) | मत : ४०५१ |
| रविशंकर दत्तोबा जाधव | (भाजपा) | मत : ४८५२ |

### प्रभाग क्रमांक १५

एकूण मतदान :९६६६

| नाव | पक्ष | मत |
|---|---|---|
| प्रवीण प्रभाकर कस्तुरे | (भाजपा) | मत : ४३२७ |
| ॲड दीपक मठपती | (भाजपा) | मत : ५३१३ |
| प्रेरणा उमाकांत होनराव | (भाजपा) | मत : ४२४५ |
| शीला शिवराज पाटील | (भाजपा) | मत : ४३२४ |

### प्रभाग क्रमांक १६

एकूण मतदान :१०६७

| नाव | पक्ष | मत |
|---|---|---|
| विनय हनमंत जाकते | (भाजपा) | मत : ३७१८ |
| राजश्री दिलीपराव धोत्रे | (भाजपा) | मत : ३०९३ |
| शीतल शिवप्रसाद मालू | (भाजपा) | मत : ३६०६ |
| गिरीश शेषेराव पाटील | (भाजपा) | मत : ३५०७ |

### प्रभाग क्रमांक १७

एकूण मतदान :८२८७

| नाव | पक्ष | मत |
|---|---|---|
| अनंत नवनाथ गायकवाड | (भाजपा) | मत : ५२४५ |
| संगीता सतीश मिरचे | (भाजपा) | मत : ३५७२ |
| शोभा महादेव पाटील | (भाजपा) | मत : ४२२१ |

### प्रभाग क्रमांक १८

एकूण मतदान : ८२७४

| नाव | पक्ष | मत |
|---|---|---|
| ऋषीकेश अशोक राजे | (भाजपा) | मत : ४५८७ |
| सत्यवती चेवले | (भाजपा) | मत : ४६९६ |
| अदिती अजित पाटील कव्हेकर | (भाजपा) | मत : ५०६४ |

## लातूरच्या जनतेने विकासाला कौल दिला

**लातूर/प्रतिनिधीः** लातूरकरांनी जो काँग्रेस पक्षाच्या विचारावर विश्वास ठेवून लातूर महापालिकेत आज काँग्रेस पक्षाला स्पष्ट पूर्ण बहुमत दिले असून सर्वधर्म समभाव विचार असणारे सुसंस्कृत शहर म्हणून राज्यात या शहराची ओळख आहे लोकनेते विलासराव देशमुख,माजी गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांनी या जिल्ह्याची विकासाची विचारांची परंपरा जपलेली आहे



यापुढेही कायम आम्ही सगळे जण मिळून विकासाच्या योजना राबवून लातूर शहर एक विकासाचे मॉडेल म्हणून विकसित करण्याचा प्रयत्न काँग्रेस पक्षाकडून निश्चितपणे होईल आमच्यावर जो विश्वास ठेवून लातूरकरांनी काँग्रेस पक्षाला विचाराला भरभरून आशीर्वाद दिल्याबद्दल सर्व लातूरकरांचे आभार व्यक्त करतो.

**– दिलीपराव देशमुख**
माजी मंत्री सहकार महर्षी लातूर

## माजी आमदार धिरज देशमुख यांची प्रतिक्रिया

**लातूर/प्रतिनिधीः** लातूर महानगरपालिका निवडणुकीत काँग्रेस व वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवारांनी मिळवलेला हा ऐतिहासिक विजय म्हणजे लातूरकर जनतेने काँग्रेसने केलेला विकास, सामाजिक न्याय आणि लोकशाही मूल्यांवर दाखवलेला ठाम विश्वास आहे. ही निवडणूक सत्तेच्या दडपशाहीविरोधात आणि अहंकाराच्या राजकारणाविरोधात जनतेने दिलेला स्पष्ट कौल आहे.लातूर शहरातील नागरिकांनी जाती-धर्माच्या पलीकडे जाऊन शहराच्या सर्वांगीण विकासासाठी मतदान केले आहे. पाणीपुरवठा, स्वच्छता, रस्ते, आरोग्य, शिक्षण आणि रोजगार या मूलभूत प्रश्नांवर काँग्रेस व वंचित बहुजन आघाडीने सातत्याने घेतलेली भूमिका जनतेला विश्वासार्ह वाटली, हे या निकालातून स्पष्ट होते. हा विजय लोकनेते आदरणीय विलासराव देशमुख साहेब यांच्या विचाराचा व त्यांनी केलेल्या विकासाचा विजय आहे. या ऐतिहासिक विजया बद्दल सहकार महर्षी आदरणीय दिलीपराव देशमुख साहेब,माजी मंत्री आदरणीय अमित विलासराव देशमुख साहेब, वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय नेते आदरणीय प्रकाश आंबेडकर साहेब, खासदार डॉ शिवाजी काळगे साहेब,सन्माननीय सुजात आंबेडकर साहेब सर्व विजयी उमेदवार, काँग्रेस नेते,कार्यकर्ते व तमाम लातूरकरांचे मी अभिनंदन करतो. निवडणूक प्रचारादरम्यान आम्ही सर्वांनी जनतेशी थेट संवाद साधत त्यांच्या प्रश्नांना प्राधान्य दिले आणि त्यावर ठोस उपाययोजना मांडल्या, याचेच हे फलित आहे.

जनतेने आमच्यावर टाकलेली जबाबदारी आम्ही प्रामाणिकपणे पार पाडू. महानगरपालिकेमध्ये पारदर्शक आणि लोकाभिमुख प्रशासन देण्यासाठी काँग्रेस व वंचित बहुजन आघाडीचे सर्व लोकप्रतिनिधी कटिबद्ध राहतील. लातूरचा सर्वांगीण विकास, सामाजिक सलोखा आणि सर्वसामान्यांच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडवणे हेच आमचे अंतिम ध्येय आहे. जनतेने दाखवलेला हा विश्वास आम्ही कधीही व्यर्थ जाऊ देणार नाही.

## 'हिंद-दी-चादर' श्री गुरू तेग बहादुर यांचे ३५० व्या शहीदी समागम वर्ष कार्यक्रमाविषयी लातूर जिल्ह्यात शाळा, महाविद्यालयांमध्ये जनजागृतीस प्रारंभ



**लातूर/प्रतिनिधीः** 'हिंद-दी-चादर' श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त नांदेड येथे २४ व २५ जानेवारी रोजी कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमाची व श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या कार्याची माहिती घरोघरी पोहोचविण्यासाठी शिक्षण विभागामार्फत विशेष जनजागृती मोहीम हाती घेण्यात आली आहे. या मोहिमेंतर्गत शाळा, महाविद्यालयांमध्ये श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या जीवनावर आधारित माहितीपट, गीत दाखविणे यासह विविध स्पर्धांचे आयोजन केले जात आहे.

लातूर जिल्ह्यातील शाळांमध्ये आजपासून सुरु झालेल्या या उपक्रमात विद्यार्थ्यांना शाळेतील एलईडी स्क्रीनच्या माध्यमातून हिंद दी चादर श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या जीवनावर आधारित माहितीपट आणि गीत दाखविण्यात आले. तसेच काही शाळांमधील विद्यार्थ्यांनी या गीताचे सामूहिक गायन केले. जिल्हा परिषद शाळांसोबतच जिल्ह्यातील शासकीय, निमशासकीय, खासगी शाळांमध्ये हा उपक्रम राबविण्यात आला. हिंद दी चादर श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांचा इतिहास विद्यार्थ्यांपर्यंत पोहचावा, यासाठी याविषयावरील चित्रकला, गायन, निबंध आणि वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन शाळा, महाविद्यालयांमध्ये केले जाणार आहे. या स्पर्धांमध्ये सहभागी सर्व विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित केले जाईल.

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**अभियांत्रिकी काम**

**ई-निविदा सूचना क्रमांक: ०२-२०२६-SrDENC.** विभागीय रेल्वे व्यवस्थापक (पश्चिम), मध्य रेल्वे, सोलापूर, भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने, खालील कामासाठी प्रतिष्ठित कंपन्या/कंत्राटदारांकडून ई-निविदा आमंत्रित करत आहेत. **कामाचे नाव:** १) सोलापूर विभागातील KWV-LUR सेक्शनमधील बोगदा क्रमांक २ च्या आतील महत्त्वाच्या ठिकाणी स्टेबलिंग आणि पोर्टल, शॉटक्रिटिंग, रॉक बोल्टिंग इत्यादींसारखी सहाय्यक कामे करणे. २) मोहोळ-वाडी सेक्शनमध्ये ११ पुलांची पुनर्बांधणी (स्लॅब: ०६, आरसीसी पाईप: ०३, कमान पूल: ०२) आणि ०६ पुलांचे विस्तारीकरण (कमानी: ०५, बॉक्स: ०१). **कामाची अंदाजित किंमत:** २२,६६,६२,९९९.५६/-. **अनामत रक्कम:** १२,८३,३००.००/-. **काम पूर्ण करण्याचा कालावधी:** १८ (अठरा) महिने. **देखभाल कालावधी:** ४८ (अठ्ठेचाळीस) महिने. **निविदा अर्जाची किंमत:** शून्य. www.ireps.gov.in **वेबसाइटवर निविदा सादर करण्याची तारीख आणि वेळ:** ०६.०२.२०२६, रोजी **१५:०० वाजेपर्यंत.** www.ireps.gov.in **वेबसाइटवर निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ:** ०६/०२/२०२६, रोजी **१५.३० नंतर. टीप:** संभाव्य निविदाकारांना सल्ला दिला जातो की, या निविदेसाठी जारी केलेले कोणतेही बदल/शुद्धिपत्रक पाहण्यासाठी निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी वेबसाइटला वारंवार भेट द्यावी. वेबसाइट: **www.ireps.gov.in**

**विभागीय रेल्वे व्यवस्थापक (कामे),**
Akar/Sur-8 **मध्य रेल्वे, सोलापूर**
**तिकिटांसाठी UTS APP डाउनलोड करा**

निलंगा शहरातील एलआयसी विमा भरण्याचे केंद्र
**सितारी विमा सेवा केंद्र**
दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स, जनता दवाखान्यासमोर शिवाजी चौक, निलंगा.
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत
**जमीरोद्दीन सितारी**
चेअरमन क्लक मेंबर CLIA
एजंट भरती चालू आहे.
संपर्क → Off: (02384) 242224, 9422612239, 9422658396

Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26
हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी-५२/२४-२६